जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# नगर-पुणे विना थांबा व विना वाहक एसटी बस बंद, भाजप पदाधिकाऱ्यांनी कार्यालयात केले 'आंदोलन'

### विभाग नियंत्रकांना धारेवर धरत विचारला जाब, बुधवारपासून पुन्हा सुरु होणार

नगर – गेल्या अनेक महिन्यांपासून नगर पुणे विना थांबा व विना वाहक एसटी बस बंद आहे. या मागणीसाठी शहर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी मार्च महिन्यात सर्जेपुरा येथील विभाग नियंत्रकांच्या कार्यालयात आंदोलन केले होते. त्यावेळी फक्त काही दिवस बस सुरु करणात आली होती. आज पहाटे शहर जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी यांनी बसस्थानकात जाऊन प्रवाश्यांकडे चौकशी केली असता पुण्याला जाणारी विना थांबा बस पुन्हा बंद झाल्याचे त्यांना कळले. त्यांनतर पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांच्या कार्यालयात जाऊन त्यांना चांगलेच धारेवर धरत बस बंद का केल्याचा जाब विचारला.

दरोरज सकाळी नगरहून पुण्याला जाणाऱ्या प्रवाश्यांची मोठी संख्या आहे. मात्र विनाथांबा बस अस, नसल्याने या प्रवाश्यांचा खोळंबा होत असून, नाईलाजाने त्यांना खाजगी गाड्याने जावे लागते. अशावेळी खाजगी गाडीवाले प्रवाश्यांची अक्षरशः लुट करतात. अशी परिस्थिती सचिन पारखी यांनी यावेळी अधिकाऱ्यांच्या निर्देशनास आणून दिली.

यावेळी विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांनी नेहमीप्रमाणे गाड्यांची व कर्मचाऱ्यांची कमतरता यासह अनेक कारणे सांगत गाडी सुरु करण्यास असमर्थता दर्शवली. त्यामुळे संतप्त झालेल्या भाजपचे पदाधिकाऱ्यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले. लगेचच तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आल्यावर जगताप यांनी ४ जूनपासून पुन्हा पहाटे साडेपाच वाजता व साडेसहा वाजता तारकपूर बस स्थानकावरून नगर–पुणे विनाथांबा बस सुरु करण्याचा आदेश इतर अधिकाऱ्यांना दिल्यावर भाजपचे पदाधिकारी शांत झाले.

यावेळी शहर जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी व प्रशांत मुथा, सावेडी मंडल अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ, माजी शहराध्यक्ष वसंत लोढा, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, कालिंदी केसकर, श्वेता झोंड, ज्योती दांडगे, रेणुका करंदीकर, बाळासाहेब गायकवाड, नितीन शेलार, अनिल निकम, राजू मंगलारप, सुनील सकट, ज्ञानेश्वर धिरडे, राजेंद्र फुलारे, सुजय मोहिते, कैलास गर्जे, बंटी डापसे, अभिषेक दायमा आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



गेल्या अनेक महिन्यांपासून बंद पडलेली नगर पुणे विनाथांबा एसटी बस पुन्हा सुरु करण्यासाठी शहर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी विभाग नियंत्रक कार्यालयात आंदोलन केले.

## प्रेरणादायी अक्षरधन...

"मुसाफिर"–९८२२०२०६९१



### नोकऱ्या, व्यवसायात अपयशातून आता अब्जाधीश

चीनचे प्रसिद्ध उद्योजक यांचा जन्म संगीत, कथाकार असलेल्या काहीशा गरीब कुटुंबात झाला. इंग्रजी शिकण्याच्या मोबदल्यात तासभर सायकल चालवित ते पर्यटकांना शहर दाखवत. त्यांना हॉर्वर्ड विद्यापीठात शिकायचे होते पण प्रारंभीच प्राथमिक व माध्यमिक शाळेतही नापास व्हायचे. पदवीधर झाल्यानंतरही तब्बल ३० ठिकाणी अर्ज करूनही त्यांना नाकारण्यात आले.

या संघर्षानंतर तो दिवस आला. १९९९ मध्ये त्यांनी अलिबाबा कंपनीचा शुभारंभ केला. त्याचे ते सहसंस्थापक अन् माजी अध्यक्ष होते. २०१४ मध्ये त्यांनी अलिबाबाचा आयपीओ ९२.७० डॉलर या भावात आणला तेव्हा तो अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठा आयपीओ बनला.

२०१६ मध्ये अलिबाबा जगातील सर्वात मौल्यवान रिटेल कंपनी बनली. जगप्रसिद्ध फोर्ब्ज मासिकाच्या मुखपृष्ठावर दिसणारे जॅकमा हे पहिले मुख्य भूमीवरील चीनी उद्योजक होते.

एकेकाळी नोकरीच्या शोधात फिरणाऱ्या जॅक यांची कंपनी अलिबाबाने वॉलमार्ट, अमेझॉन, ईबेसारख्या कंपन्यांना मागे टाकले होते. २००९ व २०१४ मध्ये टाइम मासिकाने त्यांना जगातील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींत घेतले.

जॅक २०१७ मध्ये ते आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बनले. २०१९ मध्ये त्यांनी अलिबाबाच्या अध्यक्षपदावरून निवृत्ती घेतली आणि आपली सगळी उर्जा शिक्षण व समाजसेवेच्या क्षेत्रात वापरण्याचा निर्णय घेतला.

जॅक मा या फाऊंडेशनच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, उद्योजकता, पर्यावरण व महिला नेतृत्वासाठीही कार्यरत आहे. सध्या जॅक हे 'टाइम १०० परोपकारी' लोकांच्या यादीत सन्मानित आहे. संपत्तीचा मोठा भाग समाजासाठी वापरणारे जॅक एक प्रेरणादायी मिसाल आहे.

तात्पर्य, बालपणापासूनच अनेक समस्या, अडचणींचा सामना करूनही, असंख्य चढउतारांचा अनुभव घेऊनही जीवन उन्नत, उदात्त बनवता येते हेच जॅक मा यांचे जीवन सांगते.

# काटवन खंडोबा येथील रस्त्याचे काम तीन महिन्यांपासून बंद

### नियोजन शून्य कामामुळे ड्रेनेजलाईन तुटल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

नगर – शहरातील प्रभाग क्र. १५ मधील आयुर्वेद कोपऱ्यापासून काटवन खंडोबा मंदिर, आगरकर मळा परिसरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व पुल बांधण्याचे सुरु केलेले काम तीन महिन्यांपासून बंद असून रस्ता खोदून ठेवल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नियोजन शून्य कामामुळे ड्रेनेजलाईन तुटल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

महानगरपालिका शहर अभियंता यांनी १५ मे २०२५ रोजी पत्र देत सांगितले की, विकास योजनेनुसार १५ मीटर रस्त्याच्या मोजणीच्या खुणा देण्याचे काम नगररचना विभागाकडून प्रलंबित आहे. खुणा मिळाल्यानंतर ३० दिवसांत रस्त्याचे काम पूर्ण करण्याची ग्वाही बांधकाम विभागाने दिली होती. मात्र, प्रत्यक्षात ठेकेदार यांनी तीन महिन्यांपासून रस्ता खोदून ठेवला आहे. यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली असून, ड्रेनेज लाईन जेसीबीने तोडण्यात आल्याने रस्त्यावरून घाण पाणी वाहत आहे. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या भागात दोन कब्रस्तान, एक स्मशानभूमी आणि काटवन खंडोबा मंदिर, संजयनगर झोपडपट्टी व घकुलचा समावेश असलेल्या मोठ्या लोकवस्तीचा समावेश असून नागरिकांना प्रचंड गैरसोय सहन करावी लागत आहे.सप्तपदी मंगल कार्यालयापर्यंत कॉंक्रीटीकरणाची तरतूद असताना, सिना नदी पुलापर्यंत मात्र डांबरीकरणाचे नियोजन करण्यात आले आहे. जेथे पावसामुळे वारंवार रस्ता खराब होतो, अशा ठिकाणी कॉंक्रीटीकरणाऐवजी डांबरीकरण केल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

याशिवाय, जंगे शहीदा कब्रस्तान परिसरात साइड गटाराचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून अनेक ठिकाणी भिंती तुटल्या आहेत. नगररचना विभागाकडून खुणा मिळालेल्या नसताना ठेकेदाराने परस्पर रस्ता खणला असून, यामागे कोणाचा आदेश होता याचा खुलासा झालेला नाही.महापालिका आयुक्त डांगे यांनी संबंधित ठेकेदाराला कोणताही जाब विचारलेला नाही. उलट, १५० कोटींच्या निविदा दरात काम मंजूर करताना इतर ठेकेदारांना प्रमाण दर दिला गेला, पण या ठेकेदाराला १० टक्के जास्त दर मंजूर करण्यात आले आहेत. यामुळे मनपाच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडला असून, फेरनिविदा न काढता जादा दर मंजूर करण्याचा निर्णय संशयास्पद असल्याचे शाकीर शेख यांनी म्हंटले आहे.

या सर्व प्रकाराबाबत शाकिर शेख यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, ८ जूनपर्यंत रस्त्याचे काम सुरू न झाल्यास ९ जून रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. तसेच आयुक्त डांगे यांच्यावर चौकशी करून ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# अंमली पदार्थ तस्करीबाबत माहिती देण्यासाठी मानस हेल्पलाईन नंबर कार्यान्वित

नगर – अंमली पदार्थाची बेकायदेशीर तस्करी, विक्री व वितरण करणाऱ्या इसमांबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास नागरिकांनी त्याबाबतची माहिती मानस हेल्पलाईन क्र. १९३३ वर नोंदवावी. असे आवाहन जिल्हा पोलीस दलाचे वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

अंमली पदार्थाची बेकायदेशीर तस्करी, विक्री व वितरण करणाऱ्या इसमांबाबत तक्रार नोंदविण्याकरीता मानस हेल्पलाईन क्रमांक १९३३ (२४x७) कार्यान्वीत करण्यात आली आहे. सन २०४७ पर्यत भारत सरकारकडून नशामुक्त भारत अभियान यशस्वीपणे राबविण्याकरीता केंद्रीय गृहमंत्री, भारत सरकार यांनी नॅशनल नार्कोटिक्स हेल्पलाईन – मानस हेल्पलाईन चालु करण्याबाबत निर्देश दिले. त्यानुषंगाने नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, दिल्ली यांचे कार्यालयाकडून बेकायदेशीर अंमली पदार्थाची विक्री, वितरण आणि गैरवापर करणाऱ्या इसमांविरुध्द मानस हेल्पलाईन क्रमांक १९३३ ११ जानेवारी २०२५ रोजीपासुन (२४÷७) कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

नगर जिल्हा पोलीस दलातर्फे नागरिकांना कळविण्यात येते की, अंमली पदार्थाची बेकायदेशीर तस्करी, विक्री व वितरण करणाऱ्या इसमांबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्याबाबतची माहिती मानस हेल्पलाईन क्र. १९३३ वर नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामार्फत शहरात मोबाईल व्हॅनद्वारे कॅन्सर स्क्रिनींग तपासणी सुरू

### मोबाईल व्हॅनमुळे कर्करोगाचे वेळेत निदान होऊन उपचाराला संधी मिळेल : उपायुक्त विजयकुमार मुंडे

नगर – महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाच्या माध्यमातून कर्करोग निदान व्हॅन सेवा आपल्या शहरात सुरू झाली आहे. अहिल्यानगर शहराच्या महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेतील हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून लवकर निदान होईल व उपचाराची संधी वाढतील. अनेकवेळा कर्करोगाचे निदान अखेरच्या टप्प्यात होते. त्यामुळे उपचाराला संधी मिळत नाही. या या मोबाईल व्हॅनमुळे वेळेत निदान होईल व नागरिकांना चांगली आरोग्य सुविधा महानगरपालिकेमार्फत उपलब्ध होईल, असा विश्वास उपायुक्त डॉ.विजयकुमार मुंडे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासन संचलित कॅन्सर स्क्रिनींग मोबाईल व्हॅन मार्फत कॅन्सर स्क्रिनींग सेवेचा शुभारंभ कै. गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या यांच्या हस्ते करण्यात आला. महापालिकेच्या जिजामाता आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे झालेल्या या कार्यक्रमास डॉ. विजयकुमार मुंडे, माजी नगरसेवक मीना चोपडा, प्रकाश भागानगरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतिश राजुरकर, प्रभाग अधिकारी शहाजान तडवी आदी उपस्थित होते.



राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासन संचलित कॅन्सर स्क्रिनींग मोबाईल व्हॅन मार्फत कॅन्सर स्क्रिनींग सेवेचा शुभारंभ कै. गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या यांच्या हस्ते करण्यात आला.

उपायुक्त डॉ. मुंडे म्हणाले की, नागरिकांना अधिकाधिक चांगल्या आरोग्य सेवा व सुविधा देण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून उपक्रम राबवले जात आहेत. कॅन्सर स्क्रिनींग मोबाईल व्हॅन हा त्याचाच भाग आहे. नागरिकांनी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या या सेवांचा लाभ घ्यावा, इतर आरोग्य विषयक योजनांचाही लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

सुरुवातीला कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलीप बागल यांनी राज्य शासनाच्या या उपक्रमाची माहिती दिली. पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये कॅन्सर स्क्रिनींग मोबाईल व्हॅन कार्यरत आहे. आता आपल्या जिल्ह्यात व अहिल्यानगर शहरात ही सेवा सुरु करण्यात आली आहे. स्तन कर्करोग (क्लिनिकल ब्रेस्ट परीक्षा), तोंडाचा कर्करोग (दृश्य तपासणी, बायोप्सी), गर्भाशय मुखाचा कर्करोग (ॲसिटिक ॲसिडद्वारे दृश्य तपासणी (तख), कोलपोस्कोपी मार्गदर्शित बायोप्सी) आदी तपासण्या या व्हॅनच्या माध्यमातून केल्या जाणार आहेत. या व्हॅनमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ, दंतचिकित्सक आणि प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी कार्यरत असणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, तपासणीमध्ये कर्करोगाची पुष्टी झालेल्या रुग्णांना मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये पुढील उपचारासाठी पाठवले जाते. यामध्ये शस्त्रक्रिया, कीमोथेरपी किंवा इतर आवश्यक उपचारांचा समावेश असतो. या सेवांचा लाभ घेण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख यांनी आभार मानले.

### कमलाबाई राजानी यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – शिलाविहार येथील रहिवासी कमलाबाई चेलाराम राजानी (वय ७३) यांचे ३ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### ललिताबाई चिप्पा यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – येथील तोफखाना परिसरातील नवरंग व्यायाम शाळेजवळील रहिवासी ललिताबाई राजाराम चिप्पा (वय ७१) यांचे ३ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुली, १ मुलगा, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अमोल चिप्पा यांच्या त्या मातोश्री होत.

### जैनुद्दीन रामपुरवाला यांचे हृदयविकाराने निधन

नगर – पाचलिंब गल्लीतील रहिवासी जैनुद्दीन अकबरअली रामपुरवाला (वय ४८) यांचे २ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर बालिकाश्रम रोडवरील बोहरी कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला. त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजय, १ मुलगा, १ मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगर येथील रामपुरवाला रेक्झिनचे ते संचालक होते.



### मायकल शिंदे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भोसले आखाडा येथील रहिवासी मायकल पोपट शिंदे (वय ५०) यांचे २ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सिद्धार्थनगर कब्रस्तान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे.

### सुशिला सलालकर यांचे वृद्धापकाळाने निधन


श्रीरामपूर – येथील सुशिला बबन सलालकर (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. रामदास सलालकर व शाम सलालकर यांच्या मातोश्री, नवनाथ व बापू यांच्या चुलती, चि.अभय, यश व ओम सलालकर यांच्या आजी होत.

### दशरथ फुलारे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – येथील नेहरू भाजी मार्केटमधील भाजी विक्रेते दशरथ बाबुराव फुलारे (वय ८६) यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सहा मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

भाजी विक्रेते देविदास फुलारे व प्रभात डेअरीतील कर्मचारी जालिंदर फुलारे यांचे वडील होत.

### शिल्पा भंडारी यांचे अल्प आजाराने निधन

नगर – शेवगाव येथील रहिवासी शिल्पा नितीन भंडारी (वय ४६) यांचे ३ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रात्री अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



त्यांच्या पश्चात १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

बुरुडगल्ली येथील सचिन ट्रेडर्सचे संचालक अभेष कटारिया यांच्या भगिनी होत. श्रेयस भंडारी यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगर शहरातील ऐतिहासिक वास्तू जतनासाठी १२ जूनला आंदोलन

नगर – पुरातत्व खात्याच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे नगर शहरातील ऐतिहासिक वास्तू उध्वस्त होण्याच्या मार्गावर असून या वास्तूंची जपवणूक व्हावी यासाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी समाजवादी पार्टीच्यावतीने १२ जून रोजी पुरातत्व विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांनी दिली आहे.

शहराचा स्थापना दिवस नुकताच साजरा झाला, मात्र जिल्हाधिकारी यावेळी शहराच्या संस्थापकाच्या कबरेवर चादर चढविण्यासाठी आले नाहीत. पुरातत्व विभागाचे कोणी अधिकारीही आले नाहीत. याचा निषेध करत शहरातील वास्तूंचे योग्य पद्धतीने जतन व्हावे यासाठी १२ जून रोजी पुरातत्व विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संघटनेचे अहवाल बंद आंदोलन

नगर – राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संवर्ग संघटनेच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याने जिल्ह्यात अहवाल बंद आंदोलन सुरू केले आहे. संघटनेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा राज्याध्यक्ष प्रतीभा पाटील, उपाध्यक्ष स्वप्नील जाधव आणि सरचिटणीस अशोक तोडमल यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ७ जूनपासून हिवताप कामकाज व्यतिरिक्त अन्य कामे बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच पुणे विभागाचे संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्या कार्यालयासमोर १६ जून रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद हस्तांतरण, १६ फेब्रुवारी २०२४ चा नियुक्ती प्राधिकरणाबाबतचा शासन निर्णय रद्द करावा. शासन निर्णयातील त्रुटी दूर करून प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्यांना आरोग्य पर्यवेक्षक, अवैद्यकीय आरोग्य अधिकारी व जिल्हा हिवताप अधिकारी या पदावर पदोन्नती मिळावी. आश्वासित प्रगती योजनेचा पहिला, दुसरा व तिसरा हप्ता तत्काळ मिळावा. सेवा प्रवेश नियम व आकृतिबंध याबाबतची अंमलबजावणी करताना प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश करावा. सुधारित आकृतिबंधामध्ये सर्व तालुके, जिल्हा रुग्णालय व जिल्हा प्रशिक्षण केंद्रांमध्ये आरोग्य पर्यवेक्षकांची पदे निर्माण करावीत.

जिल्हा हिवताप अधिकारी व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी पदे पदोन्नतीने भरावीत. बदल्या व पदोन्नती समुपदेशनाने करावी. बायोमेट्रिक व फेसरीडिंग उपस्थितीनुसार वेतन ही प्रणाली बंधनकारक करू नये, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. या वेळी संघटनेचे संजय नरवडे, ज्ञानेश्वर मोटकर, गणेश महाजन, प्रफुल्ल देशमुख आदी उपस्थित होते.

# ‘लोकमान्य ऑर्थोपेडिक्स’ची जालना येथे गुडघेदुखी, सांधेदुखी खुबे व मणक्याचे विकारांसाठी खास ओपीडी

जालना – पुण्याच्या लोकमान्य हॉस्पिटलतर्फे गुडघेदुखी, सांधेदुखी, खुबा आणि मणक्यांच्या रुग्णांसाठी ७ जून रोजी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत इम्पिरियल चौक, पुणे बस स्टॅण्डजवळ, अहिल्यानगर येथील अरुणोदय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे सुपर स्पेशालिटी ओपीडीचे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सांधेरोपण तज्ज्ञ डॉ.नरेंद्र वैद्य हे गुडघेदुखी, खुबा, संधिवात तसेच इतर हाडाचे दुखीने त्रस्त असणाऱ्या रुग्णांची तपासणी करणार आहेत.


डॉ.नरेंद्र वैद्य

डॉ.नरेंद्र वैद्य हे पुण्यातील लोकमान्य हॉस्पिटल या मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. विविध गावात सुपर स्पेशालिटी ओपीडी आयोजित करून रुग्णांना गुडघेदुखी, मणक्याच्या आजारा विषयी मार्गदर्शन करणे, अत्याधुनिक उपचाराची माहिती व तपासणी केली जात आहे.

रुग्णांनी तपासणीसाठी येताना आपले पूर्वीचे रिपोर्ट, एक्सरे आणि अन्य काही रिपोर्ट आपल्या सोबत आणणे आवश्यक आहे. गुडघेदुखी ही समस्या ही आता ज्येष्ठ नागरिकांपुरती मर्यादित न राहता तरुणांमध्येही मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसुन येत आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे, वाढत्या वजनामुळे गुडघ्यांच्या समस्यांनी अधिकच गुडघेदुखी होते.

गुडघ्याची तपासणी जर सुरुवातीच्या अवस्थेत केली तर औषधे व्यायामांनी आराम होतो. पण जर गुडघ्यातील कुर्चेची झीज झाली असेल तर मात्र आजकाल दुर्बिणीद्वारे उपचार, पी आर पी इंजेक्शन याव्दारे करता येतात.

अंतिम टप्प्यातील झीज, पायाला बाक आला तर मात्र सांधेरोपण शस्त्रक्रिया हाच पर्याय असतो. यात आता आमुलाग्र बदल होवुन रोबोटीकचा सहभाग यशस्वी ठरतो आहे. ही यंत्रणा भारतात आणुन रुग्णांना उपलब्ध करुन देणारे तज्ञ डॉ. नरेंद्र वैद्य स्वतः रुग्णांची तपासणी करणार आहेत.

डॉ.नरेंद्र वैद्य हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गुडघेरोपण आणि मणक्याचे तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. पुण्यातील लोकमान्य हॉस्पिटल प्रा.लि. चे ते कार्यकारी संचालक आहेत. जगातील दहा देशात त्यांनी अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत. ३५,००० हून अधिक गुडघेरोपण शस्त्रक्रिया १५,००० रोबोटीक तंत्रज्ञानाचा वापर करून आणि १,५०,००० हुन अन्य अस्थिरोग शस्त्रक्रिया त्यांनी केल्या आहेत. रोबोटीक शस्त्रक्रियेचे अमेरिका, जर्मनी आणि स्वीडन येथे प्रशिक्षण त्यांनी घेतले आहे. गुडघ्याच्या सांधेरोपण शस्त्रक्रियेतील रोबोच्या सहाय्याने सांधेरोपण हे तंत्रज्ञान अमेरिकेबाहेर भारतात प्रथम आणुन त्यांनी १५,००० पेक्षा अधिक शस्त्रक्रिया यशस्वी केल्या आहेत.

वैद्य यांनी बी जे मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस पदवी संपादन केली. नंतर ऑर्थोपीडिक्समध्ये उच्च शिक्षण घेऊन सुवर्णपदक मिळवले. १०० हुन अधिक त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मॅगझीनमध्ये त्यांचे शोध प्रबंध प्रसिद्ध झाले आहेत. देश विदेशात शंभरहून अधिक व्याख्याने त्यांनी दिली आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे ते मानद सदस्य असून अनेक महत्त्वाच्या समित्यांवर त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. ऑर्थोपेडिक हॉस्पिटलची साखळी त्यांनी स्थापन केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसामान्य जनतेला उपचार मिळावेत यासाठी ते कार्यरत आहेत.

# ११ वर्षांखालील खेळाडूंसाठी नगरमध्ये जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा

नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेमार्फत ११ वर्षांच्या खालील खेळाडू म्हणजे १/१/२०१४ नंतर जन्मलेले नगर जिल्ह्यातील खेळाडू या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत भाग घेऊ शकतील. नगर येथील १२३/५६ शांती जूनियर्स, आदर्श कॉलनी, साधना हौसिंग सोसायटी, प्रोफेसर चौक, अहिल्यानगर येथे सदरील स्पर्धेचे नियोजन केले. ८ जून रोजी सकाळी ९.३० वाजता स्पर्धेचे उद्घाटन केले जाईल. पुणे येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ या स्पर्धेतून निवडण्यात येणार आहे. अंतिम निकाल पत्रकाप्रमाणे २ मुले व २ मुली, म्हणजेच प्रथम २ खेळाडू राज्यस्तरावर पाठविण्यात येतील. अहिल्यानगर जिल्ह्यातून निवड झालेल्या खेळाडूंची राज्य निवड चाचणी स्पर्धेची प्रवेश फी, रू. १००० संघटनेमार्फत भरली जाईल व तेथे राहण्याची व्यवस्था सुद्धा केली जाईल. तसेच पहिल्या ५ खेळाडूंना (मुले व मुली) आकर्षक करंडक सुद्धा देऊन गौरविण्यात येणार आहे

स्पर्धा ११ वर्षांखालील मुले व मुली खेळाडूंसाठी खुली असून खेळाडूंनी येताना बुद्धिबळ पट, सोंगट्या, जेवणाचा डबा व पिण्याचे पाणी आणावे. सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

प्रवेश ऑनलाईन स्वीकारले जाणार आहेत. स्पर्धा यशस्वी करण्याकरिता अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना प्रयत्नशील असून अहिल्या नगर जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा.

निवड चाचणी स्पर्धेतील प्रवेश नोंदणी करता व माहितीकरिता :– यशवंत बापट ९३२६०९२५०१, पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८, प्रशांत धंगेकर, ९९२१३७७९८८, देवेंद्र ढोकळे ८६००४१२६३३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेने केले आहे.

सहभाग घेण्यासाठी खालील गुगल फॉर्म भरून आपला प्रवेश निश्चित करा. https://docs.google.com/forms/d/1rOGefS3OšTJCfu5lFDFBbxuwzfck-nQro-v2a8zguM0/edit

# नगर येथील बाबासाहेब शिंदे यांचे आर.एस.पी. अधिकारी प्रशिक्षण पूर्ण

## रस्ते अपघातातील मृत्यूचे प्रमाण आता निश्चित कमी होणार : पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

नगर – सावेडी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे केशवराव गाडिलकर हायस्कूलचे शिक्षक बाबासाहेब बबन शिंदे यांनी नुकतेच महाराष्ट्र राज्य गृह विभाग पोलीस व शिक्षण विभागाच्या अधिकारांतर्गत महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण (आर एस पी) अधिकाटी प्रशिक्षण २१ ते ३० मे या कालावधीत पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथे यशस्वीरित्या पूर्ण केले. सदर प्रशिक्षणाअंतर्गत महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटन, नागपूर यांच्या मार्गदर्शनानुसार पदकवायत, वाहतूक नियंत्रण, नागरी संरक्षण, अग्निशमन सेवा, प्रथमोपचार आणि आकस्मिक सेवा इत्यादी विषयाचे परिपूर्ण मार्गदर्शन प्राप्त केले.



बाबासाहेब शिंदे यांनी आर.एस.पी. अधिकारी प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र प्रदान करताना पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे.

महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार शिक्षकी पेशातील नोकरी करताना आर एस पी अधिकारी बनून खाकी वर्दी परिधान करण्याची संधी प्राप्त झाल्याचे समाधान आणि विद्यालयातील विद्यार्थ्यांना येत्या शैक्षणिक वर्षात शिस्त व अनुशासन यांचे धडे विशेष तासिकेअंतर्गत प्राप्त होणार आहे. त्यामुळे वाढत्या अपघातात होणारे मृत्यूचे प्रमाण व कायमस्वरूपी येणारे अपंगत्वाचे प्रमाण निश्चित कमी होईल. येत्या शैक्षणिक वर्षापासून आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिस्त व अनुशासन यांचे धडे विशेष ताशिकेमधून दिले जाणार आहेत.

प्रशिक्षणासाठी विभागामार्फत राज्यस्तरीय तज्ञ प्रशिक्षण शकील शेख, मुसा सय्यद, मोरे मेजर, बर्डे मॅडम, विभागीय समादेशक सिकंदर शेख, जिल्हा समादेशक सोमनाथ बोंतले उपजिल्हा समादेशक प्रकाश मिंड, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, शिक्षणाधिकारी अशोक कडूस व आर. एस.पी. चे राज्याध्यक्ष संजय शेंडे, उपाध्यक्ष पितांबर महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.

# इतरांच्या जीवनात सुखशांतीसाठी सर्वांनी काम केले पाहिजे

## डॉ. कमर सुरुर यांचे प्रतिपादन; गाता रहे मेरा दिल, स्वरछंद ग्रुप व मख़दुम सोसायटीतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा


अलका मुंदडा, रजनी भंडारी, राजश्री शितोळे, अ‍ॅड. मनिषा केळगंद्रे, शबाना शेख, भारती शेवते, भावना केदार


रेश्मा आठरे, जागृती ओबेरॉय, रचना काकडे, अ‍ॅड.स्वाती जाधव, सलोनी जाधव, रविना कांबळे

नगर – आज समाजामध्ये जो तो स्वतःच्या जीवनामध्ये सुखशांतीसाठी झटत आहेत. परंतु समाजातील इतरांसाठी धडपड करणारी माणसे फार कमी बघायला भेटतात. अश्या दुर्बल घटकांसाठी त्यांच्या जिवनात सुख शांती व समृद्धीसाठी समाजातील सर्वांनी काम करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या सहसचिव व आंतरराष्ट्रीय शायरा डॉ. कमर सुरुर यांनी केले.

गाता रहे मेरा दिल ग्रुप, स्वरछंद ग्रुप व मखदूम सोसायटीच्यावतीने शहरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी डॉ. कमर सुरूर बोलत होत्या. यावेळी स्मिताताई पानसरे, सुफी गायक पवन नाईक, उर्जिता फाउंडेशनच्या संध्याताई मेढे, जागरूक नागरिक मंचाचे सुहासभाई मुळे, रहमत सुलतान फाउंडेशनचे युनुसभाई तांबटकर, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संजय सपकाळ, संगीतप्रेमी अमृत मुथा, अ‍ॅड. रवींद्र शितोळे, जीवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, अ‍ॅड. संतोष गायकवाड, मुस्कान असोसिएशनचे शफकत सय्यद, राजकुमार गुरनानी, अ‍ॅड. अमीन धाराणी, शिल्पकार विकास कांबळे, सुनंदा तांबे, अ‍ॅड. गुलशन धाराणी, डीसीबी बँकेचे सुरज सय्यद, नागेबाबा मल्टीस्टेटचे श्री. कदम, संजय गाडे, सेलिंग किचनचे राहुल कुकरेजा आदी उपस्थित होते. यावेळी वंचित व दुर्बलांसाठी नेहमी कार्य करणाऱ्या अलका मुंदडा, रजनी मनोज भंडारी, राजश्री शितोळे, अ‍ॅड. मनिषा केळगंद्रे – शिंदे, शबाना शेख, भारती शेवते, भावना केदार, रेश्मा आठरे, जागृती ओबेरॉय, रचना काकडे – तौर, अ‍ॅड. स्वाती जाधव, सलोनी जाधव, रविना कांबळे यांचा सन्मानचिन्ह पुस्तक पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आले.

व या सन्मानार्थींच्या सन्मानार्थ सुरेल गीतांची महफील आयोजित करण्यात आली. यामध्ये नगरच्या हौशी कलाकारांनी रसिकांना आपल्या स्वर व गीतांनी मंत्रमुग्ध केले. प्रत्येक सन्मान व गीतांना रसिकांनी वाह... वाह.. व टाळ्यांच्या गजरात दाद दिली. या कार्यक्रमासाठी संध्याताई मेढे, राजकुमार गुरनानी व आबीद दुलेखान यांचे सहकार्य मिळाले.

पुढे बोलताना डॉ. कमर सुरुर म्हणाल्या की समाजात नेहमीच पुढे पुढे राहणाऱ्या लोकांचा व फक्त आपल्या नाव व चर्चेसाठी काम करणाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात सन्मान होत असतो. परंतु जे खऱ्या अर्थाने मनाने समाजात वंचित, दुर्बलांचं विकास व्हावा या भावनेतून काम करणाऱ्या महिलांचा सन्मान या ग्रुपतर्फे करण्यात आलं ही कौतुकास्पद बाब आहे असे नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपा माळी व विजय माळी यांनी केले. आबिद खान यांनी आभार मानले.

# विकासाच्या गाड्याला जो वेग आला आहे तो टिकून ठेवण्याचे काम नागरिकांच्या हातात

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; चाणक्य चौक आदर्श कॉलनी येथे मीनाताई चोपडा यांच्या पाठपुराव्यातून रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

नगर – आपला देश स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष पूर्ण झाली. या कार्यकाळात शहर विकासासाठी एवढा मोठा निधी कधी मिळाला नव्हता, मंजूर करून आणलेली विकास कामे अंतिम टप्प्यात आली आहे. काही राजकीय स्वयंघोषित पुढारी या कामांवर टीका करत आहे, तर त्यांचे कामच असते विरोध करणे, आणि टीका करणे. काल्पनिक चित्र उभा करून बोलत राहणे तरच ’ते’ लोकांना आकर्षित करू शकतात, पण तशी परिस्थिती राहिली नाही. आता नगरकर ही हुशार झालेले आहे. मी महापालिका, विधानसभा, लोकसभा अगदी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत च्या निवडणुका लढवल्या आहेत. ज्यांना समाजामध्ये किंमत नाही त्यांना जास्त महत्त्व दिले नाही. महाराष्ट्रात असे वाचाळवीर लोक आहेत त्यांच्याकडे जनता मनोरंजनाने पहात असतात. शहरातील कॉलनी पासून ते डीपी रस्त्यापर्यंत कॉंक्रिटीकरणाच्या कामासाठी निधी आणला आहे. उपनगरातील बहुतांश रस्त्यांची कामे राज्य शासनाच्या निधीमधून पूर्ण देखील झाली आहे. काही कामे करायची बाकी आहेत. ते देखील मंजूर आहेत मध्यवर्ती शहरातील रस्त्यांची कामे सुरू असून जनतेला अडचण निर्माण झाली आहे. परंतु कामे करीत असताना ठेकेदाराला विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आता एकदा काम केल्यानंतर पुन्हा ते करण्याची गरज भासणार नाही, थोड्या दिवस त्रास सहन करा कायमस्वरूपी चे प्रश्न मार्गी लागले जातील. असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.


चाणक्य चौक आदर्श कॉलनी येथे माजी सभापती मीनाताई चोपडा यांच्या पाठपुराव्यातून व आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ गुरुवर्य राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

चाणक्य चौक आदर्श कॉलनी येथे माजी सभापती मीनाताई चोपडा यांच्या पाठपुराव्यातून व आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ गुरुवर्य राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते झाले. यावेळी आ. संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, डॉ. बलराज पाटील, सीए अशोक पितळे, अभय कांकरिया, संजय ताथेड, राजू शेटिया, बाळू धाडीवाल, संजू गुंदेचा, किशोर डागा, सावन गुगळे, संदीप शिंगवी, डॉ. अजय देशमुख, प्रतीक पाचपुते, विशाल दाभाडे, दिनेश भंडारी, गौरव झवर आदीसह नागरिक उपस्थित होते.

राजाभाऊ कोठारी म्हणाले, पावसाळ्यात जशा भुईछत्र्या उगत असतात आणि जात असतात त्यामुळे विरोधांकडे लक्ष न देता शहर विकासाची कामे मार्गी लावावी. आ. संग्राम जगताप यांनी विकासाचा रथ सुरू केला आहे. त्या रथाचा वेग मंदावता कामा नये. शहरामध्ये रस्त्यांची कामे सुरू आहे त्याचा त्रास आपल्याला होत आहे, तो त्रास काही दिवस सहन करायचा आहे. त्या मुळे खेड्याची ओळख पुसून महानगराची ओळख निर्माण होणार आहे. आ. संग्राम जगताप यांच्या दूरदृष्टीमुळे शहर बदलत असून त्या विकासकामासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे ते यावेळी म्हणाले.

सीए अशोक पितळे म्हणाले, आम्ही लहान असताना शहरांमध्ये कुठलेही काम नव्हते मात्र! आमदार संग्राम जगताप यांनी पुढील ५० वर्षाचे काम केले आहे. एवढी मोठी कामे करणे हे २५ वर्ष काम करणाऱ्यालाही जमत नाही. तुम्ही प्रस्ताव तयार करण्यापासून ते मंजुरी मिळवत कामे केले आहे. आमदार संग्राम जगताप यांची शहरी विकासासाठी असणारी टीम देखील चांगली आहे. ठेकेदार प्रशासनाने देखील उत्कृष्ट दर्जेची कामे करून घ्यावी कारण या कामा पाठीमागे आमदार संग्राम जगताप यांचे नाव जोडलेले आहे. असे ते म्हणाले.

शहरात चांगले काम करणारी नगरसेवकांची टीम आहे. त्या माध्यमातून नागरिकही समाधानी असून विकास कामावर बोलू लागली आहे. ते ऐकायला मिळत असून विकसित नगर निर्माण होत आहे. ही जनभावना निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे निवडणुका होणार असल्याने इच्छुकांच्या संख्या देखील वाढल्या आहेत. आता कार्यक्रमाला दिसायला लागले आहे. हे लोक ५ वर्षे गायब असतात. त्यांचे समाजामध्ये योगदान काय आहे?हे नागरिकांनी देखील लक्षात ठेवले पाहिजे की, आपल्याला ५ वर्षे सेवा देण्याचे काम कोणी केले? विकासात्मक काम कोण करते हे लक्षात ठेवले पाहिजे. सेवा देणारी मंडळी निवडून दिली पाहिजे. शहरात विकास कामे सुरू आहे. जर वेगळ्या विचाराचे लोक आले तर शहर विकास थांबला जाईल. यासाठी अशा लोकांना बाजूलाच ठेवले पाहिजेत विकासाच्या गाड्याला जो वेग आला आहे तो टिकून ठेवण्याचे काम नागरिकांच्या हातात आहे. आपल्याला थेट विमानतळापर्यंत आपला विकास घेऊन जायचं आहे अशी भावना आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

आदर्श कॉलनीतील दोन्ही रस्ता कॉंक्रिटीकरणाची कामे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून पूर्ण होत आहे. या दोन्ही रस्त्यांना कुंदन कांकरिया व राजेंद्र मुनोत पथमार्ग असे नामकरण करायचे आहे. अनेक दिवसांपासून रस्त्याची कामे प्रलंबित होती ते आता मार्गी लागत आहे त्यामुळे कॉलनीतील रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे मत संजय चोपडा यांनी व्यक्त केले.

# भिकादास आढाव यांच्या कामाचा आदर्श इतर कर्मचाऱ्यांनी घ्यावा

## जलअभियंता परिमल निकम यांचे प्रतिपादन, अहिल्यानगर महानगरपालिकेचे कर्मचारी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

नगर – वसंत टेकडी येथील पाण्याच्या टाकीवर सेवा देत, शहरातील काही भागांना टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन भिकादास आढाव यांनी केले होते. पाणीपुरवठा सारख्या विभागामध्ये भिकादास आढाव यांनी कर्तव्यदक्ष राहत वेळेवर पाणीपुरवठा करण्याचे काम केले आहे. त्यांच्या कामाचा आदर्श इतर कर्मचाऱ्यांनी घेऊन पालिकेचे हित जोपासण्याचे काम करावे, तसेच नगरकरांना चांगल्या दर्जाची सेवा द्यावी असे मत जलअभियंता परिमल निकम यांनी व्यक्त केले.


अहिल्यानगर मनपाचे कर्मचारी भिकादास आढाव यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना जलअभियंता परिमल निकम.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील ज्येष्ठ कर्मचारी भिकादास रामचंद्र आढाव यांच्या सेवानिवृत्ती समारंभाचे विभागातील कर्मचाऱ्यांनी आयोजन केले होते. सत्कार समारंभात आढाव यांना शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्यासोबतचे अनुभव सांगून, त्यांच्या सेवेला मानवंदना दिली. आढाव यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करत, सहकाऱ्यांचे आभार मानले. सत्कार समारंभात विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी आपुलकीने सहभाग घेतल्याने वातावरण भारावून गेले होते.

भिकादास आढाव यांनी तब्बल ३९ वर्षे महापालिकेच्या विविध विभागांमध्ये सेवा बजावत आपल्या कार्याचा ठसा उमटविला. आढाव यांनी आपल्या सेवाकाळात १५ वर्षे पाणीपुरवठा विभागात, १५ वर्षे अग्निशमन विभागात, तर ९ वर्षे उद्यान विभागात जबाबदारीने कार्य केले. त्यांचा कार्यकाळ संयम, समर्पण आणि कर्तव्यनिष्ठा यांचे प्रतीक ठरला आहे. त्यांच्या योगदानाचा गौरव करताना उपस्थित सहकारी व अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेची भावना दिसून येत होती. यावेळी जलअभियंता परिमल निकम, इंजि. गणेश गाडळकर, सदाशिव रोहकले, राहुल गीते, प्रदीप ढगे, आर. जे. मेहेत्रे, अफाक शेख, कैलास महामुनी, अभिजीत सपाटे, मिठू चौधरी, रामभाऊ कवडे, रवी कलोसिया, स्नेहल मुळे, अनिता ठुबे आदी कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या माध्यमातून नगरकरांची सेवा करत आपले कर्तव्य पार पाडले आहे. पाणीपुरवठा विभागामध्ये काम केलेला आनंद कायम स्मरणात राहील, जलअभियंता परिमल निकम यांच्या हाताखाली काम केले असल्यामुळे शिस्तीचे व जबाबदारीचे धडे आम्हाला मिळाले आहे. महापालिका या संस्थेमुळे आम्ही खऱ्या अर्थाने घडलो आहे. अशी भावना सेवानिवृत्त कर्मचारी भिकादास आढाव यांनी व्यक्त केली.


जिल्हा विशेष लेखापरीक्षक पदावरून एन.ए.ठोंबरे सेवानिवृत्त झाले, त्यानिमित्त त्यांचा सन्मान करण्यात आला.

# जिल्हा विशेष लेखापरीक्षक पदावरून एन.ए.ठोंबरे सेवानिवृत्त

नगर – नवनाथ आश्रू ठोंबरे हे जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग–२. सहकारी संस्था अहिल्यानगर वा पदावरून ३१ मे रोजी ३३ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने त्यांचा सेवापुर्ती सोहळा हॉटेल पंचवटी येथे आयोजित करण्यात आला होता.

व्यासपीठावर विशेष लेखापरीक्षक शिरीष कुलकर्णी, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी गिरीश सोनोने, रेणुकामाता मल्टीस्टेट पतसंस्था चेअरमन प्रशांत भालेराव, सहाय्यक निबंधक तुळशीराम भोजने, नगरपरिषद मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे, महाराष्ट्र ऑडीटर्स असोशिएशन कार्याध्यक्ष संदीप पाटील, ऑडीटर्स असोशिएशन जिल्हाध्यक्ष संजय दराडे, पोपटराव फुंदे हे उपस्थित होते. ठोंबरे हे पाथर्डी तालुक्यातील मोहरी गावचे रहिवाशी आहेत.

सत्काराला उत्तर देताना श्री ठोंबरे यांनी सेवाकाळात लाभलेल्या सहकार्याबद्दल उपस्थित कार्यालयातील लेखापरीक्षकांचे आभार व्यक्त केले. ३३ वर्षाच्या शासकीय सेवेत मंत्रालय, शिक्षण विभाग व सहकार विभागात ८ जिल्ह्यांमध्ये कर्मचारी ते अधिकारी अशा विविध पदावर कामकाज केले. राज्यभरातील सहकारी संस्थांचे शासकीय लेखापरीक्षण करून अनेक ठिकाणी अपप्रवृत्तींना आळा बसावा म्हणून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे महत्वाचे काम देखील केले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेव हजारे यांचे सहकारी संस्थांचे सतत लेखापरीक्षण केले होते. त्यांनी देखील त्यांचा गौरव कला.

प्रास्ताविक सेवानिवृत्त सहायक लेखाधिकारी आश्रू नरोटे यांनी तर सूत्रसंचालन सेवानिवृत्त लेखापरीक्षक पी. टी. गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यालयातील लेखापरीक्षक वामनराव घोळव, महेश वारे, जालिंदर बनसोडे, सुनील विधाटे, मनिश शेळके, सुदर्शन सानप, अनिल पारेकर, राजेंद्र कदम, अनिल चव्हाण, बाबासाहेब उंदरे, संदीप दहातोंडे, श्रीमती स्मिता कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# चाँदबिबी महाल येथून हरदिन ग्रुपच्या पर्यावरण संवर्धन सप्ताहाला प्रारंभ

## वृक्षारोपण व लावलेल्या झाडांचे संवर्धन करुन राबविले स्वच्छता अभियान, नागरिकांना दिली पर्यावरण रक्षणाची शपथ

नगर – वर्षभर वृक्षारोपण व संवर्धनाची मोहिम चालविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या पर्यावरण संवर्धन सप्ताहाचे शुभारंभ चांदबिबी महाल येथे विविध उपक्रमांनी करण्यात आले. १ ते ७ जून दरम्यान पर्यावरण संवर्धन सप्ताहातंर्गत वृक्षारोपण, संवर्धन, स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. चांदबिबी महाल येथे १ जून रोजी असलेल्या ग्रुपच्या सदस्यांचा वाढदिवस सामुदायिकपणे वृक्षारोपणाने साजरा करण्यात आला. तर लावण्यात आलेल्या झाडांना पाणी देवून वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यात आले. यावेळी महाल परिसरात स्वच्छता अभियान राबवून मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा संकलन करण्यात आला. पर्यावरणाला घातक ठरत असलेल्या प्लास्टिक मुक्तीचा संदेश देऊन नागरिकांना पर्यावरण रक्षणाची शपथ देण्यात आली.



हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या पर्यावरण संवर्धन सप्ताहाला प्रारंभ झाला असून वृक्षारोपण व लावलेल्या झाडांचे संवर्धन करुन स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

ग्रुपचे ज्येष्ठ सदस्य सीए रवींद्र कटारिया यांची मुलगी सीए धनश्री पुनीत बच्छावत यांनी अहमदाबाद आयआयएम येथून एक्झिक्युटिव्ह ल्युमिनी झाल्याबद्दल ग्रुपचे वतीने तिचा विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, रमेश वराडे, सचिन चोपडा, जहीर सय्यद, दिलीपराव ठोकळ, सीए रवींद्र कटारिया, सीए श्रेयांश कटारिया, भारतीताई कटारिया, सीए श्रेणीक कटारिया, अनुष्का कटारिया, पार्श बच्छावत, शिवाय कटारिया, प्रांजली सपकाळ, सुरेखाताई तोरडमल, संगीता सपकाळ, कांताताई गांधी, विद्याताई मिसाळ, सर्वेश सपकाळ, शेषराव पालवे, बाळासाहेब पाटील, जालिंदर अळकुटे, दशरथराव मुंडे, सखाराम अळकुटे, भीमराव फुंदे, रावसाहेब कोकणे, नामदेवराव जावळे, कांता वाघुले, अभिजीत सपकाळ, दीपकराव धाडगे, रतन मेहेत्रे, मनोहर दरवडे, दिलीप गुगळे, अशोक पराते आदी सदस्य उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, पृथ्वीचे अस्तित्व टिकवण्यासाठी, तिचे सौंदर्य हिरवाईने फुलविण्याची गरज आहे. जंगल तोड झाल्याने पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले असून, भविष्याचा विचार करुन वृक्षरोपण व संवर्धन चळवळ काळाची गरज बनली आहे. मे महिन्यात झालेला मुसळधार पाऊस हा पर्यावरणाच्या गंभीर प्रश्नाचा इशारा असून, सर्वांनी या चळवळीत योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले.

सीए रवींद्र कटारिया यांनी पर्यावरण संवर्धनासाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपची वर्षभर सुरु असलेली चळवळ प्रेरणादायी आहे. पर्यावरणाच्या निसर्गचक्रात मनुष्याने अवास्तव हस्तक्षेप केल्याने पर्यावरणाची हानी झाली आहे. यामुळे मानवी जीवनावरही विपरीत परिणाम होत आहे. मनुष्याला जगण्यासाठी वृक्षरोपणाशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सचिन चोपडा यांनी ऑक्सीजन देण्याचे काम झाडे करीत असतात, त्यांच्याकडून मिळणाऱ्या ऑक्सीजनरुपी श्वासासाठी वृक्षांना जगविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. वसुंधरा संवर्धनेचा वसा वृक्षरोपणाने जपला जाणार असल्याचे सांगितले.

सीए धनश्री बच्छावत हिने हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने वेळोवेळी झालेल्या सन्मानाने पुढील वाटचालीस प्रेरणा मिळाली. कुटुंबीयांच्या वतीने झालेला सन्मान हा आनखी चांगले कार्य करण्यास ऊर्जा देत असल्याचे, सत्काराला उत्तर देताना सांगितले.

या अभियानात सुधीर कपाळे, विठ्ठल (नाना) राहिंज, अनिलराव तोरडमल, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, प्रशांत चोपडा, ईवान सपकाळ, दीपकराव बडदे, अविनाश जाधव, विकास भिंगारदिवे, अनंत सदलापूर, सरदारसिंग परदेशी, रामनाथ गर्जे, अविनाश पोतदार, सुभाष पेंढुरकर, अनिलराव सोळसे, दिनेश शहापूरकर, राजू कांबळे, किरण फुलारी, सूर्यकांत कटोरे, दीपक मेहतानी, मुन्ना वाघस्कर, शशिकांत पवार, राजू लुणिया, पप्पू फुलारी, विनायकराव कुलकर्णी, सुहास देवराईकर, नवनाथ वेताळ, योगेश चौधरी, प्रशांत भिंगारदिवे, परबजीत सागू, नवनाथ खराडे, कुमार धतुरे, शिवांश शिंदे, यश कनोजिया, संतोष मिसाळ सहभागी झाले होते.



एलएलबी परीक्षेत नोमान जहागिरदार प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याचा सत्कार करताना आर. एम. मुन्शी आदी.

# न्यू लॉ कॉलेजचा नोमान जहागिरदार एलएलबी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

नगर – न्यु लॉ कॉलेज, अहमदनगर येथील विद्यार्थी नोमान जहागिरदार हा कायद्याच्या अभ्यासक्रमात प्रथम श्रेणीने उत्तीर्ण झाला.

नोमानने सांगितले की, मला कायद्याच्या अभ्यासक्रमात पुढील उच्च शिक्षण एल.एल.एम. आणि पुढील पदवी बार ॲट लॉ करण्याची इच्छा आहे. तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये वंचित घटकांना संविधानाच्या अनुसार मदतीचा हात देण्याची इच्छा आहे.

माजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी आर. एम. मुन्शी यांनी सांगितले की, कायद्याची पदवी प्राप्त झाल्यानंतरही आपण उच्च शिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली, याबाबत तुमचे अभिनदंन आणि शुभेच्छा तसेच सर्वच उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी एम.पी.एस.सी. आणि यु.पी.एस.सी.च्या परिक्षेबाबतही विचार करावा. जेणेकरुन कायद्याचे अभ्यासक प्रशासकीय अधिकारी होऊन सर्वसामान्य जनतेस उचित न्याय देऊ शकतील.

नोमान हा सामान्य कुटूंबातील असून, त्याची आई श्रीमती ॲड. साजिया सय्यद आणि आजोबा पै. ॲड. फारुख सय्यद हे कायद्याचे अभ्यासक आहेत. त्यांचे वडील अजीम जहागिरदार यांनी त्यांच्या सर्व शिक्षक वर्गाचे मार्गदर्शन करणाऱ्या मित्रमंडळाचे आभार मानले.

# मंगलदिप मल्टीस्टेटच्या कर्जदारास ४ महिने कैद व ६०,००० रुपये दंड

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार शेरीनाज अलीम सय्यद, रा. बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून ४ महिने कैद व ६०,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १ महिना कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. शेरीनाज अलीम सय्यद यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने शेरीनाज अलीम सय्यद यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने कर्जदार शेरीनाज अलीम सय्यद यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचेकरीता ॲड. सुहास एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड.अमित अडागळे व ॲड. विलास ढोणे, ॲड.गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात

## सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट नगर चॅप्टरचा उपक्रम; यशस्वी विद्यार्थ्यांच्या वाटचालीस बळ देणारा उद्योजकांचा प्रेरणादायी सोहळा

नगर – सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, नगर चॅप्टरच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या पंधरवडा मीटिंगमध्ये इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. उद्योजकांच्या विकासासाठी आणि नव्या पिढीला दिशा देण्याच्या उद्देशाने काम करणाऱ्या या ट्रस्टच्या वतीने गुणवंतांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी ट्रस्टचे चेअरमन अजित पवार, सेक्रेटरी नंदेश शिंदे, खजिनदार सचिन शिरसाठ, चॅप्टरचे सर्व सदस्य, शहरातील उद्योजक व पुणे येथील व्यावसायिक प्रशिक्षक उपस्थित होते.



सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, नगर चॅप्टरच्या वतीने दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

चेअरमन अजित पवार म्हणाले की, दहावी व बारावी ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची पायरी असून, त्यात मिळवलेले यश म्हणजे त्यांच्या उज्वल भविष्यासाठीचा मजबूत पाया आहे. या यशातून विद्यार्थ्यांनी अधिक प्रेरणा घेत सातत्याने पुढे वाटचाल करावी. त्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीचे महत्त्व स्पष्ट करुन विद्यार्थ्यांना भविष्यात योग्य दिशा निवडण्याचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात उद्योजकांच्या पाल्य असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार पालकांसह करण्यात आला. सत्कारमूर्तींमध्ये पायल धनंजय पवार, अंजली राठोड, पीयुष गुंडू, सर्वेश तवले, ऐश्वर्या ठाणगे, दिव्या राणे, आणि आर्चित कदम यांचा समावेश होता. त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी पालकांच्या वतीने ॲड. तवले यांनी ट्रस्टच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत आभार मानले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे असे उपक्रम समाजाला दिशा देतात, असे ते म्हणाले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उद्योजक सचिन राणे, हॉटेल सुवर्णम प्राईडचे महेश धुमाळ आणि तोडमल क्लासेसचे अक्षय तोडमल यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन नंदेश शिंदे यांनी केले. ट्रस्टचे खजिनदार सचिन शिरसाठ यांनी आभार मानले. सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट द्वारे उद्योजकांच्या उन्नतीसाठी चालविलेल्या चळवळीमध्येमध्ये सहभागी होण्यासाठी या ९२७१७१०८९२ क्रमांकावर संपर्क साधावा.

# निवृत्तीनंतरची रक्कम सुरक्षित ठिकाणी गुंतवा

## कृष्णकुमार शेंदवाड यांचा सल्ला

नगर – निवृत्त कामगारांना सेवापूर्ती नंतर मिळणारी त्यांची रक्कम सुरक्षित ठिकाणी गुंतवण्याचा व सायबर फसवणुकी पासून सावध राहण्याचा सल्ला प्रमुख पाहुणे म्हणून कोतवाली स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक कृष्णकुमार शेंदवाड यांनी आपल्या भाषणात दिला. ऑनलाईन फ्रॉड झाला तर काय करायचे याचीही सखोल माहिती त्यांनी दिली.

कायनेटिक इंजिनीअरिंग लिमिटेड ही अहिल्यानगर येथील एक नामांकित ऑटोमोबाईल पार्टस् उत्पादक कंपनी आहे. आपल्या दीर्घकालीन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ एक विशेष सेवापूर्ती समारंभ नुकताच आयोजित केला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कंपनीचे वरिष्ठ मनुष्यबळ महाव्यवस्थापक शशिकांत गुळवे म्हणाले की हा समारंभ कंपनीच्या ५३ वर्षांच्या गौरवशाली परंपरेचा आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा उत्सव म्हणून साजरा केला जात आहे. हा समारंभ केवळ निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठीच नव्हे, तर कंपनीच्या मूल्यांनुसार, त्यांच्या योगदानाचा आदर करण्यासाठी आणि पुढील पिढीला प्रेरणा देण्यासाठी आयोजित केला गेला आहे.



कायनेटिक इंजिनीअरिंग लिमिटेड कंपनीतील निवृत्त कामगारांच्या सेवापूर्ती सोहळ्यास उपस्थित असलेले कोतवाली स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक कृष्णकुमार शेंदवाड आदी.

दीर्घ सेवा बजावलेल्या किशोर वाघ, भरत शिंदे, रावसाहेब कांबळे, सुनील कांबळे, बाळू लोंढे, विलास देसाई, शेषराव कारखेले, तानाजी भोंगले, बापू बेडसे व प्रकाश सोनवणे या कर्मचाऱ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सेवापूर्ती निमित्ताने विशेष यथोचित सन्मान करण्यात आला.

यातील किशोर वाघ यांना नुकताच या वर्षीचा जाणीव फाऊंडेशनचा गुणवंत कामगार पुरस्कार मिळालेला आहे.

कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजपाल शर्मा यांनी निवृत्त कर्मचाऱ्यांना उद्देशून आवाहन केले की ते फक्त वयाने निवृत्त झाले असले तरी शरीराने ते तंदुरुस्त आहेत, त्यामुळे त्यांच्या कौशल्याचा उपयोग त्यांनी कंपनीतील नवीन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी करावा व यापुढेही कार्यरत रहावे. कंपनीचा हा उपक्रम त्यांच्या कर्मचाऱ्यांविषयीच्या बांधिलकीचे प्रतीक आहे आणि भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी एक प्रेरणादायी पाऊल असेल.

सत्काराला उत्तर देतांना कर्मचारी नेते किशोर वाघ यांनी कंपनीच्या कार्यसंस्कृतीबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत. कार्य–जीवन समतोल, सहकार्यपूर्ण वातावरण, आणि शिकण्याच्या संधींचे कौतुक केले आहे. विशेषतः प्रशिक्षणार्थी आणि नवोदित कर्मचाऱ्यांसाठी ही कंपनी एक उत्तम व्यासपीठ असल्याचे नमूद केले गेले आहे. कार्यकाळात केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी सर्वांना धन्यवाद दिले. सूत्रसंचालन सुरेश जाधव यांनी तर राजेंद्र लांडगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमासाठी कर्मचारी उपस्थित होते. रावसाहेब भाकरे, दिलीप ससे, गणेश पवार, शुभम गुळवे आदी मनुष्यबळ विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# मंगलदिप मल्टीस्टेटच्या कर्जदारास ४ महिने कैद व ४०,००० रुपये दंड

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार आस्मा मुश्ताक शेख, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून ४ महिने कैद व ४०,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १ महिना कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. आस्मा मुश्ताक शेख यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने आस्मा मुश्ताक शेख यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने कर्जदार आस्मा मुश्ताक शेख यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे व ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.



संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान डी.बी.टी.च्या तांत्रिक अडचणीमुळे गेल्या ४ महिन्यापासून लाभार्थी वंचित होते. आता त्या अडचणी दूर होऊन लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा होत आहे. (छाया – लहू दळवी)

# संजय गांधी निराधार अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा

नगर – संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान डी.बी.टी.च्या तांत्रिक अडचणीमुळे गेल्या ४ महिन्यापासून लाभार्थी वंचित होते. त्यामुळे त्यांच्या उपजीविकेचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबतची सर्व माहिती आमदार शिवाजीराव कर्डिले यांना सांगितल्यानंतर त्यांनी तातडीने संजय गांधी शाखेचे नायब तहसीलदार गणेश भानवसे यांच्याशी संपर्क साधू लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून त्यांचे अनुदान त्यांच्या खात्यावर जमा करण्याचे आदेश दिल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात हे अनुदान संजय गांधी योजनेच्या ११० लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाले. आमदार कर्डिले यांनी नेहमीच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला असल्याचे प्रतिपादन भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांनी केले.

नगर तालुका तहसील कार्यालय येथे संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी नायब तहसीलदार गणेश भानवसे यांच्याकडे केली.

यावेळी वसंत शिंदे, दरेवाडी ग्रामपंचायत माजी सरपंच अनिल कराडे, बाबासाहेब धीवर, सुधीर देठे, खडसे पाटील आदीसह लाभार्थी उपस्थित होते.

नगर तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांचे आधार अपडेट नसणे, आधार बँकेला लिंक नसणे, आपल्या कोणत्या खात्याला आधार लिंक आहे व कोणता मोबाईल नंबर लिंक आहे ते माहीत नसणे. यामुळे तालुक्यातील ४०% लाभार्थ्यांना पेन्शन जमा होण्यास साठी अडचण निर्माण होत होती. आमदार कर्डिले यांच्या प्रयत्नातून लाभार्थ्यांच्या डी.बी.टी द्वारे खात्यात पैसे जमा होणार असल्याची माहिती वसंत शिंदे यांनी दिली.

# बांधकाम उद्योगाचा देशाच्या विकासात सिंहाचा वाटा

## विनोद बहेती यांचे प्रतिपादन; ठेकेदार व पुरवठादारांचा सन्मान – अदानी सिमेंटचा गौरव उत्सव संमेलन

नगर – खेड्यांचा भारत वेगाने बदललाय. गावात पक्की घरं. मोठमोठ्या इमारती, गुळगुळीत सिमेंट काँक्रिटचे रस्ते दिसतात. शहरांचा झपाट्याने विस्तार होतोय. बांधकामाचा वेग अनेक पटींनी वाढलाय. मुलभूत सोयीसुविधांचं पाहता पाहता जाळं तयार झालंय. टेक्नॉलॉजीचाही वेग सुपरफास्ट आहे. अर्थव्यवस्था वेगाने घोडदौड करत आहेत. जगात भारत समृद्ध अन् संपन्न म्हणून गणला जात आहे. या सगळ्या यशात देशातील बांधकाम क्षेत्रातील उद्योगांचा सिंहाचा वाटा आहे, असे प्रतिपादन अदानी उद्योग समुहाचे सीईओ विनोद बहेती यांनी केले.



अदानी समुहाच्या अंबुजा व एसीसी सिमेंट कंपनीचे संयुक्त ठेकेदार व उद्योजक यांचा सन्मानपुर्वक गौरव करण्यात आला. यावेळी अदानी सिमेंट समुहाचे टेक्निकल सर्व्हिसेस हेड इंजिनिअर (वरिष्ठ अभियंता) उमेश सोनी, जिग्नेश गांधी, सुरेश बाबु, चंद्रशेखर निघोनकर, अमरेश खमितकर आदी.

उद्योगांनाही या गोष्टीची जाणीव आहे. त्यासाठीच ठेकेदार, पुरवठादारांच्या कार्याचा योग्य सन्मान करण्याचं सामाजिक भान अदानी समूह, एसीसी सिमेंटनं जपलं. अहिल्यानगर येथील एका छोटेखानी कार्यक्रमात जिल्ह्यातील ठेकेदार आणि डीलर मंडळींना पुरस्कार देऊन त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यात आला. अदानी समुहाच्या अंबुजा व एसीसी सिमेंट कंपनीचे संयुक्त ठेकेदार गौरव उत्सव संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनासाठी जिल्ह्यातील प्रमुख ठेकेदार आणि डीलर उपस्थित होते. विनोद बहेती यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगने उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना अदानी सिमेंट समुहाचे टेक्निकल सर्व्हिसेस हेड इंजिनिअर उमेश सोनी म्हणाले की, गावात साधं घर बांधायचं असो किंवा शहरात टोलेजंग इमारत बांधायचा असो. यासाठीचा कच्चा माल म्हणजे सिमेंट उपलब्ध करुन देण्याचं काम देशातील प्रथितयश उद्योगांनी केलं. त्यांच्या या वाटचालीत त्यांना ठिकठिकाणच्या ठेकेदार आणि पुरवठादारांनी मोलाची साथ दिली. त्यांच्या या कामगिरीमुळेच आज सशक्त राष्ट्रनिर्माण होत आहे.

या कार्यक्रमात अदानी सिमेंट समुहाचे टेक्निकल सर्व्हिसेस हेड इंजिनिअर (वरिष्ठ अभियंता) उमेश सोनी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. पश्चिम भारत टेक्निकल हेड इंजिनिअर जिग्नेश गांधी यांनी अदानी ग्रुपमधील दोन्ही सिमेंटच्या गुणवत्तेविषयी माहिती दिली. तसेच अदानी रिवॉर्ड कनेक्ट याबाबत माहिती दिली.

अदानी ग्रुप भविष्यात कशा पद्धतीने वाटचाल करणार आहे. त्याची दिशा काय असेल याची माहिती दक्षिण महाराष्ट्र मार्केटिंग प्रमुख सुरेस बाबू यांनी दिली. पश्चिम महाराष्ट्र टेक्निकल हेड चंद्रशेखर निघोनकर यांनी प्रास्ताविक केले. अदानी सिमेंटच्यावतीने ठेकेदारांना त्यांच्या योगदानाबद्दल पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. इंजिनिअर अमरेश खमितकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी अहिल्यानगर शाखा समन्वयक सुमित चौधरी व अन्य विभागप्रमुख उपस्थित होते. उपक्रम यशस्वीतेसाठी दिग्विजय देशमुख, संदीप खामकर, सचिन ठाकरे, सचिन बिराज, सूरज मुंडे आदी परिश्रम घेतले.

# गरमागरम मुगडाळ भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, आता प्रत्येकाला पावसाचे वेध लागले आहेत. रिमझिम पावसात गरमागरम भजीचा आस्वाद घेण्यासारखा दुसरा आनंद नाही. हॉस्टेलमध्ये गप्पांचा फड जमवताना मस्त मूग डाळ भजी समोर असतील तर दोस्तांची मैफल छान रंगेल. मूग डाळ भजीची रेसिपी जाणून घेऊ.

**सामग्री:** अर्धा किलो मूग डाळ,चमचाभर आलं-लसूण पेस्ट, बारीक चिरलेली हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबिर, अर्धा टी स्पून चाट मसाला, एक चमचा गरम मसाला, चिमूटभर हिंग, मीठ आणि तेल.

**कृती:** मूग डाळ रात्रभर भिजत घाला. सकाळी पाणी काढून मिक्सरमध्ये रवाळ वाटून घ्या. एका भांड्यात काढून त्यात हिंग, गरम मसाला, चाट मसाला, आलं-लसूण पेस्ट, मिरचीचे तुकडे, कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मिक्स करा. कढईत तेल गरम करा. भजीचं पीठ या तेलात हळूच सोडा. नीट तळून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.



# जोश

# सीएची तयारी सोडून रमला मसाला शेतीत

अचिव्हर

बिहारमधील मुझफ्फरपूरमधून एक अनोखी यशोगाथा समोर आली आहे. पारंपारिक शेतीपासून दूर जाऊन, एक तरुण मसाल्याच्या शेतीकडे वळला. सीएची तयारी सोडून त्याने शेती करण्याचा विचार केला. त्याच्या प्रयत्नांना फळ आलेले दिसत आहे. एवढेच नाही, तर तो जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा देत आहे. मुजफ्फरपूरमध्ये शेतीने प्रेरित होऊन विकास कुमार नावाच्या एका तरुणाने आपली सीएची तयारी सोडून मसाल्यांची शेती सुरू केली.

**सुरुवातीला त्रास**

विकास कुमारला सुरुवातीला अनेक अडचणी आल्या. हळूहळू त्याचे उत्पन्न वाढत गेले. सध्या तो दरमहा किमान १ ते १.५ लाख रुपये कमावत आहे. शेतीतून उत्पन्न वाढवण्यासाठी त्याने एक रोपवाटिकादेखील सुरू केली आहे. तिथून तो मसाल्याच्या पिकांच्या रोपांची विक्री करतो. विकास कुमार या कामावर खूप खूश आहे. तो म्हणतो, एवढी कमाई गावात कुटुंबासह राहण्यासाठी पुरेशी आहे. आता त्याची मोठ्या प्रमाणात मसाले वाढवण्याची तयारी सुरू आहे.



**मसाल्यांच्या पिकाने बदलले आयुष्य**

विकास कुमार मुशारी ब्लॉकमधील रोहुआ गावचा रहिवासी आहे. त्याने वाणिज्य शाखेत पदवी प्राप्त केली आहे. त्याचे स्वप्न सीए होण्याचे होते. वडील शेतकरी आहेत. शेती आणि बागकामातील त्यांचे समर्पण आणि कठोर परिश्रम पाहून विकास कुमारने आपला विचार बदलला. सीएची तयारी सोडून दिली. घरी शेती आणि बागकामाला प्रोत्साहन देण्यासाठी मसाल्यांवर संशोधन केले. रात्री झोपताना त्याच्या मनात मसाल्यांच्या शेतीचा विचार आला.

**मसाल्याच्या पिकांची रोपवाटिका**

विकास कुमार म्हणतो, त्याने पश्चिम बंगालमधून दालचिनी, वेलची, लवंग यासह सर्व प्रकारच्या मसाल्याच्या वनस्पती आणल्या आणि त्यांची लागवड करून त्याचे उत्पन्न वाढवले. मसाल्याची लागवड ही जिल्ह्यातील एक अनोखी गोष्ट आहे. जवळच्या शेतकऱ्यांना मसाल्याच्या शेतीबद्दल कळले तेव्हा तेही ते मागण्यासाठी येऊ लागले. मसाल्याच्या वनस्पतींची मागणी पाहून त्याने रोपवाटिका सुरू केली. आता दरमहा किमान १ ते १.५ लाख रुपये उत्पन्न आहे. उत्पन्नात आणखी वाढ होण्याची शक्यता.

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

## गॅजेटच्या दुनियेत


### गुगलचा 'एआय' चष्मा साधणार संवाद

'गुगल'ने त्यांच्या गुगल आय/ओ २०२५ या वार्षिक डेव्हलपर कॉन्फरन्समध्ये अनेक मोठ्या आणि आश्चर्यकारक घोषणा केल्या आहेत. या वेळी कंपनीचे संपूर्ण लक्ष 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस' (एआय) वर होते. या परिषदेत सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे गुगलचे नवीन स्मार्ट चष्मे. ते 'अँड्रॉइड एक्सआर' तंत्रज्ञानावर आधारित आहेत. या चष्म्यांमध्ये 'गुगल'चा शक्तिशाली 'जेमिनी एआय' वापरण्यात आला आहे. एका कार्यक्रमात 'स्मार्ट ग्लास'चे प्रदर्शन करण्यात आले. तिथे दोन गुगल प्रतिनिधी, एक हिंदी बोलणारा आणि दुसरा फारसी होते. कोणत्याही भाषेच्या अडथळ्याशिवाय ते संवाद साधू शकले. हे सर्व शक्य झाले ते चष्म्यातील 'एआय फीचर'मुळे. ते दोघांनाही संभाषण इंग्रजीत भाषांतरित करून समजण्यास मदत करत होते. म्हणजे आता संवादात भाषा अडथळा ठरणार नाहीत. हे चष्मे केवळ भाषांतरच करत नाहीत, तर वापरकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरेदेखील देऊ शकतात. म्हणजे आता तुम्हाला काही माहिती हवी असेल तर फक्त प्रश्न विचारा. चष्मा तुम्हाला लगेच उत्तर देईल.




## टेक टॉक

### अँड्रॉइड एक्सआर



या कार्यक्रमात 'गुगल'ने 'अँड्रॉइड एक्सआर प्लॅटफॉर्म'ची घोषणा केली. तो क्वालकॉम आणि सॅमसंगच्या सहकार्याने विकसित करण्यात आला आहे. या नवीन प्लॅटफॉर्मचा उद्देश स्मार्टफोनच्या पलीकडे जाऊन 'स्मार्ट ग्लासेस'सारख्या उपकरणांमध्येदेखील अँड्रॉइड अनुभव प्रदान करणे हा आहे. 'गुगल'च्या म्हणण्यानुसार प्रोजेक्ट मोहन अंतर्गत अँड्रॉइड एक्सआर या वर्षीच लाँच केला जाईल. कंपनीने 'स्मार्ट चष्म्या'च्या किंमतीबद्दल अद्याप कोणतीही माहिती दिलेली नसली तरी लवकरच त्याची किंमतदेखील उघड होईल.

## ॲप वर्ल्ड

### 'मेटा'शी थेट स्पर्धा

'गुगल'चे हे पाऊल 'स्मार्ट ग्लासेस' आणि 'मेटाव्हर्स' सारख्या प्रकल्पांमध्ये आधीच सहभागी असलेल्या 'मेटा'शी थेट स्पर्धा मानले जात आहे. गुगल ग्लास आणि अँड्रॉइड एक्सआर दोन्ही प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांना एक नवीन डिजिटल अनुभव देण्याचा दावा करतात. या कार्यक्रमात 'गुगल'ने 'एचपी'च्या सहकार्याने 'गुगल बीम' हे नवीन व्हिडीओ कम्युनिकेशन डिव्हाइस सादर केले. याशिवाय 'गुगल मीट'मध्ये लाईव्ह ट्रान्सलेशनची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भाषांमधील लोक एकमेकांशी सहजपणे बोलू शकतील. एवढेच नाही तर कंपनीने व्हिडीओ जनरेशन प्लॅटफॉर्म व्हीओ ३ ची एक नवीन आवृत्ती देखील लाँच केली आहे. त्यात आता नेटिव्ह साउंड सपोर्ट असेल आणि व्हिडीओ बनवणे पूर्वीपेक्षा सोपे होईल. कंपनीला फक्त स्मार्ट फोनपुरते मर्यादित राहायचे नाही.




# डेटा वाचवायचाय?

टेक्नोहेल्थ


हुशार युजर्स काही सोप्या पद्धतींचा अवलंब करतात. त्यामुळे इंटरनेटचा वापर कमी होऊनही त्यांचे काम सुरळीत होते. यासाठी प्रत्येक हुशार युजर पुढील ५ सोप्या आणि प्रभावी युक्त्या वापरतो.

*** ॲप्सना ऑटो-अपडेट होण्यापासून थांबवा**

अनेक ॲप्स तुमच्या नकळत बॅकग्राउंडमध्ये अपडेट होतात. त्यामुळे डेटा खूप लवकर खर्च होतो. हुशार युजर्स ऑटो-अपडेट्स बंद करतात आणि ते फक्त वाय-फायवरून अपडेट करण्यासाठी सेट करतात. यामुळे मोबाईल डेटाची बचत होईल आणि 'वाय-फाय'शी कनेक्ट झाल्यावर आवश्यक अपडेट्स मिळतील.

*** डेटा सदोदित सुरू ठेवू नका**

तुमचा फोन हवामान ॲप्स, सोशल मीडिया ॲप्स किंवा ईमेल सारख्या अनेक ॲप्सना न विचारता इंटरनेटशी कनेक्ट करत राहतो. हे सर्व बॅकग्राउंडमध्ये डेटा वापरत राहतात. अशा परिस्थितीत, तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही फोन सेटिंग्जमध्ये जाऊन या ॲप्सचा बॅकग्राउंड डेटा बंद करू शकता. त्यामुळे डेटा फक्त गरजेनुसार वापरला जातो.



*** व्हिडीओच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या**

बहुतेक ॲप्स आपोआप उच्च-गुणवत्तेचे व्हिडीओ प्ले करतात. त्यामुळे जास्त डेटा वापरला जातो; परंतु इंटरनेट योग्य प्रकार वापरणारे व्हिडीओची गुणवत्ता ४८० डीपीआय किंवा त्यापेक्षा कमी वर सेट करतात. युट्यूब, इंस्टाग्राम किंवा फेसबुकवरील व्हिडीओची गुणवत्ता मॅन्युअली कमी करता येते.

*** डेटा सेव्हर मोड चालू करा**

डेटा वाचवण्यासाठी तुम्ही तुमच्या फोनमध्ये 'डेटा सेव्हर मोड' देखील चालू ठेवू शकता. यामुळे फोन स्वतःच अनावश्यक ॲप्सना डेटा देण्यापासून थांबवतो. तुम्ही क्रोम ब्राउझर वापरत असाल, तर त्यात 'डेटा सेव्हिंग फीचर'देखील आहे. त्यामुळे 'वेबपेज' हलके होते आणि कमी डेटामध्ये लोड करते.

*** वाय-फायचा योग्य वापर**

मोफत वाय-फाय उपलब्ध असेल तर मोबाईल डेटा बंद करा आणि वाय-फायशी कनेक्ट व्हा.

# उन्हाळ्यात हे कपडे देतात थंडावा आणि आरामही !

फॅशन पॅशन

उन्हाळ्याच्या काळात कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी, बहुतेक लोक घरीच राहणे पसंत करतात. या ऋतूतील कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी योग्य कपडे निवडणे खूप महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यात घरी राहून, लोकांना हलके आणि जुने कपडे घालायला आवडते. अशा कपड्यांमध्ये कमी गरम होते.



**उन्हाळ्यासाठी पाच सर्वोत्तम कापड प्रकार**

*** कॉटन फॅब्रिकः** हे सर्वात प्रसिद्ध नैसर्गिक फॅब्रिकपैकी एक आहे. ते उन्हाळ्यासाठी सर्वोत्तम मानले जाते. कापसाच्या रोपात आढळणाऱ्या तंतुमय गोळ्यांपासून बनवलेले हे कापड घाम सहजपणे शोषण्यास मदत करते. सुती कापडामुळे तंतूंमधून हवा वाहू लागते. त्यामुळे शरीर थंड राहते. हे नैसर्गिक आणि हलके कापड उन्हाळ्यात घालण्यासाठी सर्वोत्तम आहे.

*** शीअर फॅब्रिक:** उन्हाळ्यात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या कापडांपैकी एक म्हणजे शीअर फॅब्रिक. हे पूर्णपणे सुती कापड आहे. इतर जड कापडांप्रमाणे, हे कापड उन्हाळ्यात तुमच्या शरीराला चिकटत नाही.

*** लिनन फॅब्रिक:** लिनन हे कपाशीच्या तंतूंपासून बनवलेले एक नैसर्गिक कापड आहे. हे जगातील सर्वात जुन्या कपड्यांपैकी एक मानले जाते. हे कापड सुती कापडापेक्षा मजबूत असते. तथापि, त्याची किंमत सुती कापडापेक्षा जास्त असते.


*** रायन रेयॉन:** हे उन्हाळ्यासाठी चांगले कापड आहे. त्याच्या कृत्रिम स्वरूपामुळे ते हलके असते आणि उष्ण हवामानात शरीराला चिकटत नाही. उन्हाळ्यात हे कापड घालण्यास खूप आरामदायी आहे.

*** शिफॉन कापड:** हे सर्व कापडांमध्ये सर्वात हलके आणि मऊ असते. स्टाईलचा विचार केला तर, शिफॉन फॅब्रिक तुमचा उन्हाळा अधिक आरामदायी बनवते. साडी, ब्लाउज, शर्ट, कुर्ती बनवण्यासाठी शिफॉन फॅब्रिक चांगले आहे.


# आईला नातं मान्य नाही

मॅच मेकिंग

मी २६ वर्षांची तरुणी असून उत्तम करीअर करते आहे. माझ्या वडिलांच्या मद्यपानाच्या व्यसनामुळे आई त्यांच्यापासून वेगळी झाली. तिनेच मला आणि बहिणीला वाढवलं. तारुण्यातही मला वाईट अनुभव आले. नोकरी लागल्यानंतर माझ्या आयुष्याला एक दिशा मिळाली. माझी आई आम्हा बहिणींची खूप काळजी करते. ती थोड्या जुन्या वळणाची आहे. मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर आईने माझ्यासाठी स्थळं शोधायला सुरुवात केली. लग्नाला माझी ना नव्हती. पण तिने माझ्या पसंतीकडे पूर्ण दुर्लक्ष केलं. तिला योग्य वाटणाऱ्या मुलाशी माझं लग्न लावून द्यायचं होतं. मधल्या काळात मी एका मुलाच्या प्रेमात पडले. दीड वर्ष एकत्र घालवल्यानंतर आईला याबद्दल सांगितलं. पण तिला हे नातं मान्य नाही. तो ख्रिश्चन आणि मी हिंदू आहे. त्यातच तो माझ्यापेक्षा सहा महिन्यांनी लहान आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे तो माझ्यासाठी योग्य नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती माझा मानसिक आणि शारीरिक छळ करते आहे. माझ्यासाठी तोच योग्य असल्याचं अनेकदा समजावूनही ती ऐकत नाही. आमचं नेहमी भांडण होतं. मी काय करू?



**उत्तर :** आईने तुम्हा दोघा बहिणींना एकटीने वाढवलं. त्यामुळे तिला तुमची खूप काळजी वाटते. तिच्याप्रमाणे तुझं आयुष्य उध्वस्त होऊ नये, असंही तिला वाटत असावं. म्हणूनच तुमच्या लग्नाच्या बाबतीत ती खूपच जपून पावलं टाकत आहे. महत्त्वाचं म्हणजे या मुलाबद्दल तुला खात्री वाटते का, तो तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा आदर करेल का, याचा विचार कर. आईशी मनमोकळा संवाद साध. या नात्याला तिचा का नकार आहे, हे जाणून घे. हा मुलगा कसा योग्य आहे हे तिला पटवून दे. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घेता येईल.



# आवर्जून पाहा 'ही' ठिकाणे

भटकंती

राजस्थान शाही वारशासाठी, भव्य किल्ल्यांसाठी आणि वाळवंटासाठी जगभर प्रसिद्ध आहे. पण येथील तलाव स्वर्गापेक्षा कमी नाहीत. दरवर्षी लाखो देशी तसेच परदेशी पर्यटक केवळ किल्ले आणि राजवाडे पाहण्यासाठीच नव्हे तर येथील तलावांच्या सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी येतात. येथील किल्ल्यांसोबतच सुंदर तलावही लोकांना आकर्षित करतात. राजस्थानमधील उदयपूर जिल्ह्याला तलावांचे शहर म्हटले जाते. या ठिकाणचे तलाव अवश्य पाहा

*** पिछोला तलाव**

पिछोला तलाव राजस्थानातील उदयपूर जिल्ह्यात आहे. हा तलाव उदयपूरच्या सौंदर्याचा आणि ऐतिहासिक वारश्याचा महत्त्वाचा भाग आहे. उदयपूर शहराच्या मध्यभागी असलेला हा तलाव अरवली पर्वतरांगांनी वेढलेला आहे. त्यामुळे त्याचे नैसर्गिक सौंदर्य आणखी खुलते. त्याच्या सभोवतालचे टेकड्या, राजवाडे आणि घाट खूपच आकर्षक दिसतात. पर्यटकांसाठी या तलावात बोटिंगची सुविधा आहे. सूर्यास्ताच्या वेळची बोट सफर विशेष लोकप्रिय आहे. इथे बोटीतून प्रवास करण्याची मजा वेगळीच असते. हा तलाव अंदाजे ६.९६ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेला आहे. तलाव परिसरात किंगफिशर, इग्रेट्स, टर्न्स, कूट आणि बगळे असे विविध प्रजातींचे पक्षी आढळतात. त्यामुळे पक्षी निरीक्षकांसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. पिछोला तलावाच्या मध्यभागी चार बेटे आहेत. जग मंदिर हे तलावाच्या मध्यभागी बांधलेले आहे. २०१९ पासून उदयपूरमध्ये मुंबई आणि गोवाच्या धर्तीवर क्रूझ सेवा सुरू झाली आहे. तलावाच्या काठावर सिटी पॅलेस, बागोर की हवेली आणि इतर ऐतिहासिक इमारती आहेत. त्या पर्यटकांसाठी आकर्षण ठरतात.

*** फतेहसागर तलाव**

उदयपूरच्या 'लेक सिटी' या नावाला सार्थ ठरवणारा फतेहसागर हा तलाव पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. अरवली टेकड्यांनी वेढलेला हा तलाव शांत वातावरणासाठी खूप प्रसिद्ध आहे. येथे भेट देण्यासाठी दूरदूरहून पर्यटक येतात. फतेहसागर तलाव बोटिंगसाठी खूप प्रसिद्ध आहे. सुमारे चार चौरस किलोमीटर क्षेत्रावर हा तलाव पसरलेला आहे. हा तलाव प्रामुख्याने पाणीपुरवठा आणि शेतीसाठी बांधला गेला. परंतु आता तो पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. तलावाच्या काठावरील रस्त्यावर ड्राइव्ह करणे किंवा सायकलिंग करणे यात वेगळी मजा आहे. हा रस्ता स्थानिकांमध्ये 'फतेहसागर ड्राइव्ह' म्हणून ओळखला जातो.

# कमी गुणांची काळजी नको

वेगळ्या वाटा

बारावी तसंच पदवी परीक्षेत कमी गुण मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांचा चांगलाच हिरमोड होतो. अशावेळी आपल्या आवडीनिवडींना मुरड घालावी लागते. वेगळे अभ्यासक्रम निवडावे लागतात. काही तडजोडी कराव्या लागतात. पण मित्रांनो, कमी गुण मिळाले म्हणून निराश होण्याची आवश्यकता नाही. आज करीअरचे अनेक मार्ग तुमच्यापुढे आहेत. आपली गुणवत्ता, आवड, कौशल्यं या बाबींचा विचार करून योग्य अभ्यासक्रमाची निवड तुम्ही करू शकता.




* पदवीला प्रवेश घेण्याऐवजी पॉलिटेक्निक डिप्लोमा अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. यासोबतच इंटिरिअर डेकोरेशन, एअरलाईन क्रू ट्रेनिंग, मास कम्युनिकेशन अँड व्हिडिओ प्रॉडक्शन, ट्रॅव्हल अँड टूरिझम मॅनेजमेंट, फॅशन टेक्नॉलॉजी, इव्हेंट मॅनेजमेंट, टेक्सटाईल ग्राफिक डिझाइन यांसारख्या विषयांशी संबंधित डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता.

* पब्लिक रिलेशन्स, कलिनरी आर्टस,ॲडव्हेंचर स्पोर्टस, फिटनेस ट्रेनिंग, वेब डिझायनिंग, व्हिडिओ एडिटिंग, टूर गाईड, सोशल मीडिया मार्केटिंग, ई-कॉमर्स, फॅशन स्टायलिंग, इव्हेंट मॅनेजमेंटसारख्या क्षेत्रांमध्येही अनेक संधी आहेत.

* आवडत्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही तर तुम्ही दूरस्थ शिक्षण पद्धतीने पदवी मिळवू शकता. बरीच विद्यापीठं ही सुविधा उपलब्ध करून देतात.

* व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी वेगळ्या प्रवेश परीक्षा असतात.

# केडगाव अंबिकानगर येथील ओढ्यावरील अतिक्रमण तात्काळ हटवावे; ४ दिवसांत कार्यवाही न झाल्यास आयुक्तांच्या दालनात आंदोलनाचा इशारा

## स्थानिक लोकप्रतिनिधीने ओढा बुजविल्याचा आरोप; ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह रोखल्याने केडगावात पूर स्थिती, जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – मौजी केडगाव अंबिकानगर येथील नैसर्गिक ओढ्यावर झालेल्या अतिक्रमणाबाबत तात्काळ कार्यवाही करून ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्याची मागणी केडगाव ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. ग्रामस्थांनी २ जून रोजी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधीने सदर नैसर्गिक ओढा बुजवला असून, अनेकवेळा तक्रार करुनही महापालिका प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप करण्यात आला. नुकतेच झालेल्या मुसळधार पावसामुळे सदर परिसरात पूर परिस्थिती निर्माण होवून नागरिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट करण्यात आले. चार दिवसांत कार्यवाही न झाल्यास आयुक्तांच्या दालनात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी यावेळी दिला.



केडगाव अंबिकानगर येथील ओढ्यावरील अतिक्रमण तात्काळ हटवावे; या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देताना केडगावचे ग्रामस्थ.

याप्रसंगी संदीप कोतकर युवा मंच अध्यक्ष भूषण गुंड, राजू लाळगे, पप्पू हुलगे, विलास हुलगे, सागर कोकणे, तन्मय रासने, राजू बोरगे, पप्पू मंत्री, आदिनाथ भोर, सुभाष लाळगे, सविता गाडगे, विमल कोकणी, प्रियांका शहाणे, कल्पना हजारे, सुनीता हुलगे, लक्ष्मी बोरगे, निशा बोरगे, उषा शिंदे, मीरा उदागे, अनिता पुंडलिक, ललिता पवार, अनिता खुरचेकर, पमा भोर, रागिणी शिंदे, आशा गवळी, गौरी लाळगे, ज्योती पवार, कांता पवार, मनीषा कोकणे, प्रभा साखरे, आश्विनी बोरगे, अश्विनी शहाणे आदींसह केडगाव ग्रामस्थ उपस्थित होते.

केडगावमधून नैसर्गिक ओढा वाहतो. हा ओढा नेप्ती गावाच्या हद्दीवरील डोंगर भागामधून उगम पावून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतो. या ओढ्यावर पाझर तलाव देखील बांधलेला आहे. जो परिसरातील जलसाठा आणि भूजल पुनर्भरणासाठी उपयुक्त आहे. केडगावात नागरी वसती तयार झाली असून, त्याच्या सांडपाण्याचा निचरा थेट ओढ्यात केला जातो. या ओढ्याचा प्रवाह नैसर्गिक उतारामुळे मोठ्या प्रमाणावर सांडपाणी आणि पावसाचे पाणी घेऊन जातो. या आधी देखील या प्रवाहात अडथळा निर्माण होऊन घरात पाणी शिरण्याचे अनेक प्रसंग घडले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मागील आठवड्यात शहर व परिसरात जोरदार मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे केडगाव परिसरात अचानक पूरस्थिती निर्माण झाली होती. विशेषत: अंबिकानगर भागातील ओढ्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे प्रवाह अडवला गेल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पूर स्थिती निर्माण झाली. अनेक घरांमध्ये पाणी शिरले, मालमत्तेचे नुकसान झाले व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.

२० व २१ सप्टेंबर २०२३ रोजी काही धारकांनी नैसर्गिक ओढ्यावर भर टाकून त्यात अतिक्रमण केले. या अतिक्रमणामुळे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण झाला. प्लॉट धारकांनी याला विरोध देखील केला, परंतु धारक कोणतीही दखल घेत नाहीत. सदर परिसराचे बिनशेती करून प्लॉटिंगचे काम सुरू आहे. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी या संदर्भात मनपा प्रशासनाकडे तक्रार करण्यात आली होती. परंतु अद्यापही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

हेमंत ढगे यांनी २०२३ मध्ये केलेल्या तक्रारीनुसार महापालिकेने नगर–पुणे महामार्गावरील केडगाव नेप्ती रस्त्यालगत खलील गॅरेज शेजारी असणारा ओढा बुजवून ते गिळकृंत करण्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. ओढा बुजवून तेथे बंदिस्त ड्रेनेज लाईनचे पाईप टाकून काम पूर्ण केले असून, सदर ओढा बुजविला असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना पाहणी दरम्यान निदर्शनास आले. याप्रकरणी प्रभाग अधिकारी यांनी विजय पठारे व राजू पठारे यांना २९ मे २०२४ रोजी संबंधित कागदपत्रे जमा करण्याचे लेखी पत्र दिले होते. मात्र यासंदर्भात देखील कारवाई झाली नसल्याचे ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधले.

ओढ्यावर झालेले अतिक्रमण त्वरित हटविण्यात यावे, ओढ्याचं नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करावा, सांडपाण्याची नियोजनबद्ध व्यवस्था करावी, ओढा बुजवून अतिक्रमण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, पूरस्थिती व हानी झालेल्या नागरिकांच्या नुकसानीचे पंचनामा करुन नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केडगाव ग्रामस्थांनी केली आहे.

# बाजारपेठेतील एकमेव स्वच्छतागृहही महापालिकेने पाडले

## पुरुषांसाठी तात्पुरती पर्यायी व्यवस्था पण महिलांची कुचंबना सुरु

नगर – शहरातील बाजारपेठेच्या परिसरात असलेले गंजबाजार येथील भाजी मंडईतील स्वच्छतागृह मनपाने ३ जून रोजी जेसीबी लावून पाडले आहे. या ठिकाणी पुरुषांसाठी पत्रे लावून तात्पुरती व्यवस्था केली असली तरी महिलांची मात्र कुचंबना सुरु झाली आहे. त्यामुळे महिला वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

बाजारपेठेच्या परिसरात केवळ गंजबाजार येथील भाजी मंडईत महिला व पुरुषांसाठी एकमेव स्वच्छतागृह होते. त्याची अत्यंत दुरवस्था झालेली होती. त्यामुळे या ठिकाणी नव्याने स्वच्छतागृह उभारण्यास महापालिकेने मंजुरी दिलेली होती. मात्र सध्या आहे ते स्वच्छतागृह पाडल्यास बाजारपेठेतील व्यावसायिक, कर्मचारी तसेच येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होणार असल्याने आहे. ते स्वच्छतागृह पाडण्यास परिसरातील व्यावसायिकांचा विरोध होता.



गंजबाजार येथील भाजी मंडईत बाजारपेठेतील एकमेव असलेले स्वच्छतागृह पाडण्यात आले आहे. (छाया – लहू दळवी)

परंतु त्यांच्याशी चर्चा करून तातडीने पूर्ण करण्यात येईल. सदर नवीन स्वच्छतागृहाचे काम लवकरच पंढरीची वारी सुरु होणार असून गंजबाजार परिसरात मुक्कामी थांबणारी दिंडी येण्यापूर्वी हे काम पूर्ण करण्यात येईल याची दक्षता घेतली जाणार असल्याचे महापालिकेचे अभियंता श्रीकांत निंबाळकर यांनी सांगितले. या ठिकाणी पुरुषांसाठी पत्रे लावून तात्पुरती व्यवस्था केलेली आहे. तसेच हा सर्व व्यावसायिक परिसर असल्याने आणि तेथे फिरते शौचालय उभे करण्यासाठी जागाही नसल्याने नागरिकांना काही दिवस अडचणीचा सामना करावा लागेल, पण त्यास नाईलाज असल्याचे अभियंता निंबाळकर यांनी सांगितले.

दरम्यान सध्या पावसाचे दिवस असल्याने नागरिकांना स्वच्छतागृहाची अत्यंत आवश्यकता असून याच काळात स्वच्छतागृह पाडले गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यात प्रामुख्याने महिलांची मोठी अडचण होणार असल्याने महिला वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे.



भारतीय सैन्य दलात ३० वर्ष देश सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या सुभेदार सतिष सुर्यवंशी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

# ३० वर्ष देश सेवा करून सुभेदार सतिष सुर्यवंशी सेवानिवृत्त

नगर – नगर तालुक्यातील रुईछत्तीसी येथील सुभेदार सतिष आसाराम सुर्यवंशी हे भारतीय सैन्य दलात ३० वर्ष देश सेवा करून ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवापूर्ती सोहळा केडगाव येथील ज्ञानेश्वरी लॉन्स येथे रविवारी (१ जून) साजरा करण्यात आला.

या सोहळ्यात सुभेदार सतिष सुर्यवंशी व त्यांच्या पत्नी सौ. कल्याणी सुर्यवंशी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक मनोज कोतकर, पोपट बोरुडे, जाधव मेजर, डॉ. ठवाळ, अमरेंद्र सोनावळे, अनिता सोनावळे, दिपक तागडे, श्रद्धा सुर्यवंशी आदींनी मनोगत व्यक्त केले.

विशेष म्हणजे कार्यक्रमाचे नियोजन सुर्यवंशी, सोनावळे, नन्नवरे, गायकवाड, साळे, सोनवणे, रोकडे, साबळे या बहिणींनी केले होते, त्याचे सर्वस्तरातुन कौतुक होत आहे. यावेळी सुभेदार सतिष सुर्यवंशी यांनी ३० वर्षाच्या देश सेवेच्या काळातील विविध घटना, अनुभव सांगत भावनिक होऊन सर्वांचे ऋण व्यक्त केले. पोपट सुर्यवंशी, सुनिल सुर्यवंशी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. निखिल सुर्यवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रमास परिसरातील आजी, माजी सैनिक, शिक्षक, मित्रमंडळ, नातेवाईक, अथर्व कॉलनीतील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाचे घर फोडून चोरट्यांनी दागिन्यांसह रोकड पळवली

नगर – बंद घराच्या दरवाज्याचे कडी, कोयंडा, कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करुन घरातील लाकडी कपाटातील सोन्याचे दागिने रोख रक्कम तसेच बॅग असा ऐवज चोरुन नेला. ही घटना बालिकाश्रम रोडवरील अयोध्या कॉलनी येथे ३१ मे रोजी रात्री ९ ते १ जून रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत विजय भाऊसाहेब शिरसाठ (वय ३२, रा. आयोध्या कॉलनी, बालिकाश्रम रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांना सुट्टी असल्याने ते त्यांच्या कुटुंबासह ३१ मे रोजी रात्री ९ वाजता पाथर्डी तालुक्यातील पिंपळगाव टप्पा येथे गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी फिर्यादी यांचे घर मालकाचा पुतण्या प्रसाद चिपाडे याचा फोन आला की तुमच्या घराचा दरवाजा उघडा आहे व घराच्या दाराजवळ दोन पर्स अस्ताव्यस्त पडलेल्या दिसून येत आहे. असे त्याने कळवले. त्यानंतर फिर्यादी हे तातडीने बालिकाश्रम रोडवरील आयोध्या कॉलनीतील घरी आले. घराची पाहणी केली असता घरामधील सर्व सामान अस्ताव्यस्त स्थितीत पडलेले दिसून आले. लाकडी कपाटाचे कुलूप तोडून आतील सर्व सामान जमिनीवर फेकलेले दिसले. कपाटात ठेवलेले दागिने व पैसे पाहिले असता, ते मिळून आले नाही. चोरट्यांनी कपाटातील ४ ग्रॅम वजनाची गळ्यातील सोन्याची चेन, ५ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे झुमके २ नग, ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनी, ४ हजार रुपयाची रोकड, व निळ्या रंगाची एक बॅग (त्यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदानकार्ड, आर सी बुक, वाहन चालवण्याचा परवाना व इतर महत्त्वाची कागदपत्रे असलेली) असा ऐवज चोरुन नेला.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी विजय शिरसाठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बी एन एस कलम ३३१ (३), ३०५ प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार दीपक जाधव हे करीत आहेत.

# झेंडीगेट येथील कत्तलखान्यावर छापा, ३५० किलो गोमांस जप्त

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तल करुन त्यांचे मांस विक्री करणाऱ्या कत्तल खान्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकत एकास ताब्यात घेऊन ७० हजार रुपये किमतीचे ३५० किलो गोमांस जप्त केले. ही कारवाई झेंडीगेट येथील आंबेडकर चौक येथे २ जून रोजी करण्यात आली.



झेंडीगेट येथील कत्तलखान्यावर छापा टाकून ३५० किलो गोमांस जप्त करत एकास ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

कोतवाली पोलीस शहर हद्दीत पेट्रोलिंग गस्त करीत असताना त्यांना माहिती मिळाली की झेंडीगेट येथील आंबेडकर चौकात एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करुन त्यांचे मांस विक्री केली जात आहे, अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलिसांनी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या आदेशान्वये त्या ठिकाणी जाऊन छापा टाकला असता, त्यांना एका पत्र्याच्या शेडमध्ये एक इसम दिसून आला. त्याच्या हातात लोखंडी सत्तूर आणि समोर गोवंशीय जनावरांचे मांस, हाडाचे तुकडे पडलेले होते. खोलीत सर्वत्र रक्ताचे डाग दिसून आल्याने पोलिसांनी छापा टाकून तेथील वसीम बशीर शेख (वय ३६, रा. घासगल्ली, कोठला झोपडपट्टी, अ. नगर) यास ताब्यात घेतले. पोलिसांनी तेथून ७० हजार रुपये किमतीचे ३५० किलो गोमांस, एक लोखंडी सत्तूर व एक लोखंडी सूरी असा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ. सूरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वसीम शेख याचे विरुद्ध बी एन एस कलम २७१ सह महा. प्राणी रक्षा अधि. १९९५ चे सुधारित २०१५ चे कलम ५ (अ) (क) ९, ९ (अ) तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधि. १९६० चे ११, म पो.का. क ११९ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास महिला पोलीस अंमलदार रोहिणी दरंदले या करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अंमलदार ए पी इनामदार, सचिन लोळगे, दिपक रोहकले, तानाजी पवार, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, प्रतिभा नागरे, रोहिणी दरंदले, सुरज कदम यांनी केली.

# जिल्ह्यातील २२ पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्ह्याबाहेर बदल्या

## पोलिस महानिरीक्षकांचे आदेश, जिल्ह्यात नवीन अधिकारी आले बदलून

नगर – महानिरीक्षक कराळे यांनी परिक्षेत्रातील पोलीस निरीक्षक, सहायक निरीक्षक व उपनिरीक्षक यांच्या बदल्यांचे आदेश नुकतेच काढले. त्यांनी विनंती व प्रशासकीय अशा दोन्ही प्रकारच्या बदल्या केल्या आहेत. यामुळे जिल्ह्यातील २२ अधिकाऱ्यांच्या बाहेरच्या जिल्ह्यात बदल्या झाल्या आहेत. तसेच जिल्ह्यात नवीन अधिकारी बदलून आले आहेत.

कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी भगवान मथुरे यांची नाशिक ग्रामीण, शिर्डी वाहतुक शाखेचे प्रभारी प्रदीप देशमुख यांची जळगाव, शेवगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी समाधान नागरे यांची नाशिक ग्रामीण व नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले यशवंत बाविस्कर यांची नाशिक ग्रामीण येथे बदली झाली आहे. कर्जत ठाण्याचे प्रभारी दौलत जाधव यांची पिंपरी चिंचवड (पुणे) येथे बदली झाली आहे. दरम्यान, नाशिक ग्रामीण येथून यशवंत धनवडे, जळगाववरून किरणकुमार कबाडी व नंदुरबार येथून जगदीश भांबळ हे तीन निरीक्षक जिल्ह्यात बदलून आले आहेत.

तसेच महानिरीक्षक कराळे यांनी परिक्षेत्रातील सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक यांच्या देखील बदल्या केल्या आहेत. नगरवरून बदलून गेलेले सहायक पोलीस निरीक्षक व कंसात बदली ठिकाण – संदीप परदेशी, अमोल पवार व योगिता कोकाटे (नाशिक ग्रामीण), विवेक पवार, रामेश्वीर कायंदे (धूळे), सुरेश आव्हाड (जळगाव) व विश्वास भान्सी (नंदुरबार). तसेच जिल्ह्यात पूर्वी काम केलेले व वर्षभरापूर्वीच निवडणुकीच्या आधी बदलून गेलेले शिशिरकुमार व पल्लवी देशमुख हे दोघे पती– पत्नी जिल्ह्यात पुन्हा बदलून आले आहेत. ते नाशिक ग्रामीण येथे कार्यरत होते. याशिवाय जळगाव येथून अनिल मोरे व गणेश धुमाळ यांची नगर जिल्ह्यात बदली झाली आहे.

नगर जिल्ह्यातून बाहेर बदली झालेले पोलीस उपनिरीक्षक व कंसात बदली ठिकाण – सज्जन नार्हेहडा, सचिन रणशेवरे, विजय भोंबे (जळगाव), किरण साळुंके, सुरेखा देवरे, देविदास भालेराव, अमोल गायधनी, रमेश पाटील, अशोक मोकळ, शैलेश पाटील (नाशिक ग्रामीण), तर चौघांना जिल्ह्यात एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. यामध्ये तुषार धाकराव, तुळशीराम पवार, मनोज मोंढे व प्रियंका आठरे यांचा समावेश आहे. तर बाहेरून नगर जिल्ह्यात बदलून आलेले उपनिरीक्षक पुढील प्रमाणे – नाशिक ग्रामीण येथून अर्चना तोडमल, आजिनाथ कोठाळे, प्रवीण उदे, अजय कौटे, आप्पासाहेब हंडाळ, रामहरी खेडकर, बाजीराव सानप, भरत धुमाळ, किशोर गावडे व जळगाव मधून सुदाम काकडे, सागर काळे, राजू जाधव, परशुराम दळवी, गणेश वाघमारे व प्रदीप बोरूडे यांचा समावेश आहे.



# जैन वात्सल्य संस्थातर्फे गरजूंना किराणा व अन्नधान्य वाटप

जैन ओसवाल वात्सल्य संस्थेमार्फत दर महिन्याप्रमाणे गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वाटप अजित विजय बोरा (पिंपळगांव माळवी) यांच्या हस्ते करण्यात आले. धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील अशोक सचिन कोठारी यांच्या बंगल्यावर हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी अशोक (बाबूशेठ) बोरा, संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, सेक्रेटरी विजय गुगळे, अशोक कोठारी, सचिन कोठारी आदी.

# तीन महिन्यांचे अन्नधान्य आगाऊ वाटप लाभार्थ्यांना वेळेत लाभ घेण्याचे आवाहन

नगर –पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या प्रतिकूल हवामानामुळे अन्नधान्य वितरणात अडथळा येऊ नये, म्हणून केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम (NFSA) अंतर्गत ऑगस्ट २०२५ पर्यंतच्या अन्नधान्याचे आगाऊ वितरण करण्यास मंजुरी दिली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात ३० मेपर्यंत धान्याची उचल पूर्ण करणे आणि ३० जूनपर्यंत वाटप पूर्ण करणे आवश्यक आहे. जून, जुलै आणि ऑगस्ट २०२५ या तीन महिन्यांचे अन्नधान्य लाभार्थ्यांना एकत्रितपणे मिळणार असुन लाभार्थ्यांनी वेळेत अन्नधान्य उपलब्ध करुन घेण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

रास्तभाव दुकानदारांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत दुकान उघडे ठेवावे आणि दुकानाच्या दर्शनी भागात या तीन महिन्यांच्या अन्नधान्य वाटपाबाबतचा फलक लावावा. अन्नधान्याचे वितरण ई–पॉस मशिनद्वारेच करण्यात येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्यासाठी स्वतंत्र बायोमेट्रिक (अंगठा) प्रमाणीकरण करणे आवश्यक असल्याचेही कळविण्यात आले आहे.



अहिल्यानगरमधील अपर्णा रोहित थत्ते संचलित नृत्यदर्पण डान्स ॲकॅडमीच्या रिया आणि मैत्रेयी यांनी गोव्यात झालेल्या गोवा इंटरनॅशनल डान्स कॉम्पीटिशनमध्ये भाग घेतला.

# मोपेडची चोरी

नगर – शहरातील मार्केट यार्डच्या भाजी मार्केट मधील गाळा नं १८ समोर हँडेल लॉक करुन लावलेली मोपेड (क्र. एम एच १६ डी डी ७१२३) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना २ जून रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी गणेश भैरुलाल कांकरिया (वय ५४, रा. गंज बाजार, अ. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# घरासमोर लावलेल्या ट्रॅक्टरची चोरी

नगर – घरासमोर लावलेला एस्कॉर्ट कंपनीचा चार लाख रुपये किंमतीचा ट्रॅक्टर अज्ञात चोरून नेल्याची घटना नगर तालुक्याचे राळेगण म्हसोबा येथील कोतकर मळा येथे २८ मे रोजी सकाळी ९ ते रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत बाळासाहेब नारायण कोतकर (वय. ३५, रा. कोतकर मळा, राळेगण म्हसोबा, ता. नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे कुटुंबासह बाहेर गेलेले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या घरासमोर लावलेला निळ्या रंगाचा एस्कॉर्ट कुबोटा कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. एम एच १६ डी एम ४४३१) चोरुन नेला.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात बाळासाहेब कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार राहुल द्वारके हे करीत आहेत.

